अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २९ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३३० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

Supreme People who know plastics best 'सुप्रीम'
ansons anco
कॉमेट
Authorised Dealer Rivulis Irrigation रिवुलीस ठिबक सिंचन
मल्लिकार्जुन हुळ्ळे मोबा.9423590463
शाम जाधव मोबा.9423588463
'सुप्रीम'
गुरुगणेश एन्टरप्राईजेस
Lubi PUMPS-MOTORS
वैष्णवी कॉर्नर, गोल्डफिंच पेठ, युको बँक शेजारी, भागवत टॉकिज समोर, सोलापूर.दु.नं.(0217)2725363
Email:guruganeshenterprises123@rediffmail.com

## 'गोल्डन बॉय'ने इतिहास रचला




बुडापेस्ट : सुभेदार नीरज चोप्रा याने पुन्हा एकदा ऐतिहासिक कामगिरी करत देशाची मान अभिमानाने उंचावली. बुडापेस्ट येथे सुरु असलेल्या वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशीप स्पर्धेत ८८.१७ मीटर थ्रो करत नीरज चोप्रा याने सुवर्णपदकावर नाव कोरले. पाकिस्तानच्या खेळाडूला सिलव्हर पदक मिळाले. नीरज चोप्रा याच्या ऐतिहासिक कामगिरीनंतर त्याच्याक कौतुकाची थाप पडत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्रा याच्या कामगिरीचे कौतुक केले.

# 'हातभट्टीं'वर लवकरच हातोडा

## मंत्री शंभुराज देसाई यांनी दिला इशारा

पुणे विभागाच्या महसुलात मागील वर्षीपेक्षा यावर्षी १३ टक्के वाढ झालेली आहे, त्याप्रमाणेच गुन्हे अन्वेषणाचे प्रमाणात १५ टक्के वाढ झालेली आहे. तसेच हातभट्टी दारू विरुद्ध १ एप्रिल ते २७ ऑगस्ट २०२३ पर्यंत २००४ गुन्हे नोंदवण्यात आलेले आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यात ९७५, अहमदनगर ४०७ सोलापूर ५११ व विभागीय भरारी पथक १११ अशी गुन्ह्यांची संख्या असून महसूल जमा करण्याचे पुणे विभागाला दिलेले उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण होणार आहे.

सुराज्य/सोलापूर

**राज्यात अवैध दारूचा व्यवसाय बोकाळला आहे. गावागावांमध्ये बेधडकपणे हातभट्या सुरू असतात. गावात पिदोड्यांचा हैदोस असतो. शासनाने दारूबंदी करावी म्हणून महिला रस्त्यावर उतरतात तसेच अनेक गावांच्या ग्रामसभेत ठरावही होतात पण कुठे दारूबंदी होते. याचे उत्तर ना सरकार देते ना स्थानिक प्रशासन.दारूबंदी करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग आहेच पण हा विभाग काय करतो? असा प्रश्न समोर येणे साहजिकच आहे.एकमात्र राज्यासाठी एक गूड न्यूज आहे. दारूबंदीचे महायुतीच्या सरकारने मनावर घेतले आहे. शासन लवकरच हातभट्टी मुक्त गाव अभियान धोरण आणणार आहे. त्या अनुषंगाने एकाही गावात हातभट्टीची निर्मिती होणार नाही. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी गावातील सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांचा सक्रिय सहभाग असला पाहिजे.गाव हातभक्ती मुक्त करणाऱ्या गावांना बक्षिस देवून गौरविण्यात येईल,अशी घोषणा राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी केली.**




सोलापूरच्या नियोजन समितीच्या सभागृहात पुणे विभागातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांची सोमवारी आढावा बैठक झाली. त्यावेळी देसाई बोलत होते. यावेळी उत्पादन शुल्क पुणे विभागाचे उपायुक्त मोहन वर्दे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक चरणजीत राजपूत (पुणे), प्रमोद सोनोने(नगर), नितीन धार्मिक (सोलापूर) यांच्यासह विभागातील उप अधीक्षकही उपस्थित होते.

पुणे विभागातील जिल्ह्यांमध्ये कोठेही अवैद्य मद्य निर्मिती व विक्रि होणार नाही तसेच बाहेरील राज्यातील मद्य अवैधपणे येथे येणार नाही. आपल्या जिल्ह्यातून इतर राज्यात अशा पद्धतीने मद्य विक्रिसाठी जाणार नाही याबाबत उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी, नियुक्त केलेल्या भरारी पथकांनी व चेक पोस्ट वरील पथकांनी दक्षता घेत ही मोहीम अधिक तीव्र करण्याचे आदेश देसाई यांनी दिले.

उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सोयी सुविधा विभागाच्या वतीने देण्यात येतील. वाहन व इतर अद्यावत सर्व सोयी सुविधांची मागणी विहित पद्धतीने विभागाकडे त्वरित करावी. त्याप्रमाणेच आवश्यक असलेले मनुष्यबळ भरती प्रक्रिया सुरू असून पुढील सहा महिन्यात राज्यात सर्वत्र विभागाला मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत चोखपणे आपली जबाबदारी पार पाडावी,अशी सूचना त्यांनी केल्या.

### हातभट्टी मुक्त गाव अभियान

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने राज्यात मागील तीन-चार महिन्यांपासून हातभट्टी विरोधी मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेमुळे इतर मद्याच्या विक्रीत चांगली वाढ झालेली आहे. तरी राज्यात हातभट्टी मुक्त गाव अभियान राबविण्याबाबत शासन स्तरावरून लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे. या अभियानात सहभागी होणाऱ्या गावांना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात येणार आहे.पुणे विभागातील उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांनी विभागातील सर्व गावांमध्ये हातभट्टी नष्ट करण्यासाठी काटेकोरपणे कारवाई करावी,अशी सूचना देसाई यांनी केली.



### मोदीच्या नेतृत्वाखाली निवडणूका लढणार

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूक महायुती पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्याच नेतृत्वाखाली लढणार आहे. लोकसभेला महाराष्ट्रात ४५ तर विधानसभेला २२५ हून अधिक जागा मिळतील, असा दावा राज्य दारुबंदी व उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी सोलापुरातील पत्रकार परिषदेत केला.

## मड्डीवस्ती येथे विजेचा शॉक बसल्याने १६ वर्षीय मुलाचा मृत्यू



सुराज्य/सोलापूर

घरासमोर खेळत असताना पाऊस आल्याने शेजारच्या लोखंडी जिन्यावरून चढत असताना विजेच्या शॉक बसल्याने १६ वर्षीय मुलगा गंभीर जखमी होऊन मरण पावला. ही दुर्घटना मड्डीवस्ती परिसरातील शांतीनगर येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.

गजू उर्फ गजानन सुरेश टनकेदार (वय १६ रा.जवरगी जि.कलबुर्गी, सध्या रा. मड्डीवस्ती) असे मयत झालेल्या मुलाचे नाव आहे. तो आज दुपारी दोन वाजेच्या सुमारास घरासमोर खेळत होता. त्यावेळी पाऊस आल्याने तो घराशेजारी असलेल्या लोखंडी जिन्यावरून वरच्या खोलीत जात होता. त्यावेळी लोखंडी जिन्याच्या स्पर्श हाताला लागून शॉक बसल्याने तो बेशुद्ध झाला. त्याला त्वरित गौरम्मा कवलदार (आत्या) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

मयत गजू टनकेदार हा एकुलता होता. याच्या पश्चात वडील, आणि तीन विवाहित बहिणी असा परिवार आहे. त्याचे वडील अपंग असून ते माथाडी काम करीत असत. दोन महिन्यापूर्वी तो वडीलासोबत सोलापुरात बहीण आणि आत्याकडे आला होता. राखी पौर्णिमेनंतर तो परत कर्नाटकाकडे जाणार होता. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

विद्युत मंडळाच्या गलथन कारभारामुळे गजानन टनकेदार या मुलाचा मृत्यू झाला.संबंधितावर कारवाई करून मयताच्या वारसदारांना नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी त्यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

## कंदलगाव येथे विद्युत मोटारीचा शॉक बसल्याने विवाहितेचा मृत्यू

सोलापूर : पाणी भरून झाल्यानंतर पिन काढत असताना विजेच्या शॉक बसल्याने २३ वर्षीय विवाहिता मरण पावली. ही दुर्घटना कंदलगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. आरती मारुती शिंदे वय २३ राहणार कंदलगाव असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे त्या आज सकाळी सात वाजेच्या सुमारास विद्युत मोटारींने पाणी भरल्या होत्या त्यानंतर वायरचे तीन काढत असताना हाताला शॉक पडल्याने बसल्याने त्या बेशुद्ध झाल्या त्यांना अक्षय शिंदे बिर्याणी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वीच माहीत झाल्या या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## माध्यमिक शिक्षण विभागाचा खेळखंडोबा

### अधिकारी चार्ज घ्यायला तयार नाही, चौकशीची मागणी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाचा गेल्या अनेक महिन्यांपासून खेळखंडोबा होत असून त्याकडे कुणाचेच लक्ष नाही.त्यामुळे राज्याच्या शिक्षण विभागाने यात जातीने लक्ष घालायला हवे. गेल्या चार-पाच वर्षांपासून या पदावर अधिकाऱ्याचे स्थैर्य दिसत नाही. अधिकारी या पदावर बसायला का तयार नाहीत. या सर्व बाबींची शिक्षण मंत्रालयाकडून चौकशी व्हायला हवी,अशी जाणकारांची मागणी आहे.

माध्यमिकचे शिक्षणाधिकारी मारुती फडके हे पुन्हा रजेवर गेल्याचे सांगण्यात येते.माढा तालुक्याचे ते सुपुत्र असल्याने माध्यमिक विभागात आनंदाचे वातावरण होते परंतु ते का रजेवर गेले याविषयी झेडपीत उलटसुलट चर्चा रंगली आहे. माध्यमिक शिक्षण विभागाचे पद गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त होते. त्यानंतर त्या ठिकाणी प्रभारी शिक्षणाधिकारी म्हणून वठारे यांच्याकडे चार्ज देण्यात आला होता. परंतु काही दिवसानंतर त्यांच्याही प्रशासनाकडे तक्रारी आल्या होत्या .त्यामुळे त्यांनाही त्या पदावरून हटवण्यात आले होते. त्यानंतर अनेक दिवस पुन्हा ते पद रिकामे होते.

अखेर जुलै महिन्यामध्ये मारुती फडके यांच्या रूपाने माध्यमिकला अधिकारी मिळाला होता .परंतु त्यांच्याकडे चार्ज देऊनही वेळेवर ते हजर झाले नव्हते. त्यानंतर एक ऑगस्ट रोजी एक दिवसाच्या हजेरीनंतर पुन्हा त्यांनी रजा टाकली. त्यानंतर पंधरा दिवसांनी आल्यानंतर दोन दिवस हजर होऊन पुन्हा त्यांनी आजारी असल्याचे कारण सांगितले होते. त्याचबरोबर त्यांनी स्वेच्छा निवृत्तीचा अर्जही जिल्हा प्रशासनाकडे केला होता. मात्र त्यांना याबाबत प्रशासनाने कुठल्याही प्रकारची मंजुरी दिली नव्हती. त्यामुळे त्यांनी मागच्या आठवड्यात शुक्रवारी पुन्हा चार्ज घेतला होता. त्या दोन दिवसाच्या चार्ज नंतर सोमवारी पुन्हा त्यांनी अचानक रजेचा अर्ज दिल्याने खळबळ उडाली आहे.

सी ई ओ आव्हाळे यांनी त्यांचा अर्ज नामंजूर केल्यानंतर शुक्रवारी हजर झाले होते. पुन्हा रजेवरजाण्याचा निर्णय घेतला परंतु मनीषा आव्हाळे यांनी त्यांची रजा नामंजूर करण्याचा निर्णय घेत त्यांनी मेडिकल बोर्डासमोर जाऊन आपली रजा मंजूर करून घ्यावी अशी सूचना केल्या होत्या. त्यांना नोटीस काढून तत्काळ आपल्या पदावर हजर व्हावे असेही त्यांनी आदेश दिले होते गुरुवारी उशिरा सायंकाळी भेट झाली. शेवटी आव्हाळे यांनी त्यांना हजर होण्याच्या सूचना केल्या त्यानुसार फडके हे शुक्रवारी हजर राहिले होते. मात्र पुन्हा आज सोमवारी त्याने अचानक रजेवर जाण्याचे कारण समजले नसल्याने माध्यमिक शिक्षण विभागातील गोंधळ पुन्हा चव्हाट्यावर आल्याचे बोलले जात आहे.

## विभक्त राहणाऱ्या पतीचा विष पाजून जीव घेण्याचा प्रयत्न; पत्नीसह अल्पवयीन मुलावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

शेतजमीन लाटण्यासाठी पतीपासून विभक्त राहणाऱ्या पत्नीने आपल्या मुलाकरवी अन्नातून विष देऊन पतीचा जीव घेण्याचा प्रयत्न केली. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथे रविवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली . या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी विषप्रयोग झालेल्याची पत्नी, मेहुणा आणि त्याच्या अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

तो ४२ वर्षीय इसम बबलाद येथे राहण्यास असून त्याचा शेती व्यवसाय आहे. पतीबरोबर पटत नसल्याने त्याची पत्नी आपल्या १४ वर्षीय मुलाला घेऊन कर्नाटक येथे माहेरी गेल्या ५ वर्षापासून राहण्यास आहे.

पतीच्या पश्चात कोणी नसल्याने शेतजमीन बळकावण्यासाठी तिने काटा काढण्याचा बेत रचला. आणि तिच्या १४ वर्षीय मुलास दीड महिन्यापूर्वी पतीकडे (बबलाद) येथे पाठवून दिले. मुलाचे मामा आणि आईच्या सांगण्याप्रमाणे त्याने रविवारी सकाळी वडीलाच्या जेवणात पिकावर फवारणीचे द्रव मिक्स केले होते. विष कालवलेले अन्न जेवताना त्याला संशय आला. त्यानंतर वडिलाने मुलाला खडसावून विचारले.तेव्हा त्याने आई आणि मामाच्या सांगण्यावरून अन्नात विष कालवल्याचे सांगितले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्याने अक्कलकोट दक्षिण पोलिसात तक्रार दाखल केली. विष मिश्रीत अन्नाचे नमुने जप्त करून रासायनिक प्रक्रियेसाठी पाठवून दिले. पुढील तपास हवालदार कोळी करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हे' टॅलेंट जपायला पाहिजे!

कल्याण 899-62-336

मुंबई 790-60-677

# सोलापूरसह चार रेल्वे स्थानकांचे रूप पालटणार

## आंतरराष्ट्रीय सुविधा देण्याचा केंद्र सरकारचा संकल्प




सुराज्य/सोलापूर

उस्मानाबादसह सोलापूर, पंढरपूर, कुर्डुवाडी या चार रेल्वे स्थानकांचे रूप पालटणार असून त्याठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा प्रवाशांना मिळणार आहेत. महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्याचा केंद्र सरकारने पुनर्विकास परियोजनेतंर्गत हा निर्णय घेतला असून सोलापुरातील तीन आणि उस्मानाबाद अशा स्थानकांचा त्यात समावेश केला आहे

रेल्वे विकासाला आणखी गती देण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधांची निर्मिती वेगाने केली जात आहे. देशभरातील १हजार ३०९ स्थानकांचा पुनर्विकास करण्यासाठी अमृत भारत स्टेशन योजना सुरू करण्यात आली असून त्यात मध्य रेल्वेच्या एकूण ७६ स्थानकांचा समावेश आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील ४४ स्थानकांचा समावेश आहे. अमृतभारत स्टेशन योजनेंतर्गत, ही रेल्वे स्थानके एअर कॉन्कोर्स, वेटिंग रूम, एक्झिक्युटिव्ह लाउंज, फूड कोर्ट, लिफ्ट्स, एस्केलेटर यासारख्या जागतिक दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असतील. दिव्यांगांसाठी अनुकूल सुविधा आणि भूमिगत पार्किंगसाठीही तरतूद करण्यात आली आहे. या स्थानकांवर शहर बस आणि इतर वाहतुकीसह मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी असेल. सौरऊर्जा, जलसंधारण आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था असेल.अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा असतील.

### 'ही' स्थानके होणार विकसित

कांजूरमार्ग, परळ, विक्रोळी, अहमदनगर, दौंड, कोपरगाव, कुर्डुवाडी जंक्शन, लातूर, उस्मानाबाद, पंढरपूर, सोलापूर, आकुर्डी, कोल्हापूर, तळेगाव, भुसावळ विभाग - बडनेरा, मलकापूर, चाळीसगाव, मनमाड, शेगाव, बल्लारशाह, चंद्रपूर, धामणगाव, गोधनी, हिंगणघाट, काटोल, सेवाग्राम, नरखेड, पुलगाव, वडसा, गोंदिया, चांदाफोर्ट, औरंगाबाद, गंगाखेड, हिंगोली डेक्कन, जालना, किनवट, मुदखेड, नगरसोल, परभणी, परतूर, पूर्णा, सेलू, वाशिम, परळी वैजनाथ यांचा समावेश आहे.

### विमानतळाप्रमाणे रेल्वेस्थानकं होणार चकाचक

या सर्व रेल्वे स्थानकांवर विमानतळाप्रमाणे जागतिक दर्जाच्या सुविधा उभारल्या जातील. प्रवाशांना सुरक्षा, प्रवासाचा चांगला अनुभव आणि उत्तम सुविधा देणे हे भारतीय रेल्वेचे उद्दिष्ट आहे. रेल्वे स्थानकाची इमारतही अत्याधुनिक सुविधांसह सुसज्ज आणि पर्यावरणपूरक असेल. याठिकाणी सौरउर्जा उपकरणे आणि इतर सुरक्षा उपकरणे असतील. रेल्वे स्थानकांच्या एन्ट्री आणि एक्झिट पॉईंटसवर प्रवाशांची नेहमी गर्दी होते. त्यासाठी या पाच स्थानकांवर एक्सेस कंट्रोल गेट, सरकते जिने लावले जातील. तसेच स्थानकांवर प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी, एटीएम आणि इंटरनेट यासारख्या सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जातील.

### मनमान-पंढरपूर रेल्वेची मागणी

राज्यातील वारकऱ्यांचे श्रध्दास्थान असलेल्या पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी उत्तर महाराष्ट्रातील लाखो भाविक जातात. त्यांच्यासाठी मनमाड ते पंढरपूर अशी रेल्वे सुरू करण्याची मागणी नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे.

# सायबर भामटे

कृत्रिम बुद्धिमत्ते'चा (आर्टिफिश्यल इंटेलिजन्स - एआय) वापर करून अल्पवयीन मुलींची अश्लील छायाचित्रे तयार करणाऱ्या एका तरुणाला मध्यंतरी विरारच्या अर्नाळा सागरी पोलिसांनी अटक केली. 'एआय'च्या माध्यमातून करण्यात आलेला हा राज्यातील पहिलाच गुन्हा ठरला. गेल्या काही वर्षांचा अभ्यास केल्यानंतर अभ्यासकांना असे आढळून आले आहे की, सायबर गुन्ह्यांमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. 'एआय'च्या मदतीने अल्पवयीन मुलींची अश्लील छायाचित्रे तयार करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली. नालासोपारा पश्चिमेच्या कळंब गावातील जीत निजाई (१९) याने अनेक मुलींची अश्लील छायाचित्रे तयार करून त्याआधारे बनावट 'इन्स्टाग्राम' खाती तयार केली. त्याआधारे जीत आणि त्याचा भाऊ यश यांच्यावर विनयभंग, माहिती तंत्रज्ञान कायदा, बालकांवरील लैंगिक अत्याचार विरोधी कायदा (पोक्सो) आदी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. आरोपी जीत याने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने तरुणींची अश्लील छायाचित्रे तयार केली. त्याचा वापर करून इन्स्टाग्रामवर बनावट खाती उघडून मुलींची बदनामी केली. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या दोन तरुणींना सोमवारी रात्री जीत आणि भाऊ यश (२२) यांनी मारहाण केली. तक्रारीनंतर पोलिसांनी रात्री उशिरा दोघांना अटक केली. त्यांच्या चौकशी दरम्यान 'एआय'चा वापर करून दोघांनी तरुणींची अश्लील छायाचित्रे तयार केल्याचे उघड झाले. 'एआय' यंत्रणेमध्ये एखादे छायाचित्र अपलोड केल्यास त्यात आपल्याला अपेक्षित बदल करता येतात. एखाद्या व्यक्तीचे शरिरसौष्ठवपटू म्हणून छायाचित्र कसे असेल, अशी सूचना दिल्यास त्याप्रमाणेत छायाचित्रात बदल करून नवीन छायाचित्र आपल्यापुढे सादर केले जाते. याच पद्धतीचा गैरवापर करून कोणाचेही अश्लील छायाचित्र तयार केले जाऊ शकते. त्याचा पुढे गैरवापरही केला जाऊ शकतो. सायबर भामटे एक पाऊल पुढे जाऊन 'डीप फेक' प्रकाराचा वापर करून मोठे गैरव्यवहार करत आहेत. 'डीप फेक' हे 'डीप लर्निंग' व 'फेक मीडिया' यांचे एकत्रीकरण म्हणता येईल. त्यात आवाज, चित्रफीत यांच्यात 'एआय'च्या मदतीने बदल केला जातो. प्रसिद्ध व्यक्ती, चित्रपटसृष्टीतील कलाकार, राजकारणी यांच्याबद्दल चुकीची माहिती पसरवण्यासाठी त्याचा वापर होतो.



अशाच यंत्रणेचा वापर करून सायबर भामट्यांनी ब्रिटनमधील एका वीज कंपनीला २०१९ मध्ये हंगेरी येथील बँक खात्यात एक कोटी ९७ लाख रुपये जमा करण्यास भाग पाडले होते.अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठात झालेल्या संशोधनानुसार हॅकर्स 'एआय'चा वापर करून अचूकरीत्या पासवर्ड चोरू शकतात. 'अकॉस्टिक साइड-चॅनल अटॅक' हा सायबर हल्ल्याचा एक प्रकार आहे. त्यात संगणक किंवा उपकरणातून येणारे विविध आवाज किंवा कंपनांचा (व्हायब्रेशन) वापर संवेदनशील माहिती मिळवण्यासाठी केला जातो. पासवर्ड टाईप करताना मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून त्याचा गैरवापर केला जातो. त्यात टायपिंगसाठी लागलेला वेळ, इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन वापर आणि ध्वनी तरंगांचे विश्लेषण करून एखादा पासवर्ड ही यंत्रणा शोधते. त्याचा वापर सायबर गुन्हेगारीसाठी होऊ शकतो. याशिवाय हॅकिंगमध्येही 'एआय'द्वारे मदत घेतली जाऊ शकते. त्यात संगणकीय यंत्रणा किती सक्षम आहे, त्यात कोणत्या त्रुटी आहेत, अशी विविध माहिती 'एआय'द्वारे हॅकर्सला मिळू शकते. त्या माहितीच्या आधारे यंत्रणा हॅकही केली जाऊ शकते.व्यवसायातील अनेक व्यवहार, विशेषतः बहुराष्ट्रीय कंपन्याचे व्यवहार ईमेलद्वारे होतात. 'एआय' यंत्रणा अल्गोरिदम संप्रेषण पद्धतीचा वापर करून ईमेलची पद्धत आणि इतर बाबींचे विश्लेषण करू शकतात. त्याद्वारे कंपनीचा उच्चाधिकारी, परदेशी वितरक यांच्या नावाने ईमेल पाठवले जाऊ शकतात. त्याद्वारे कंपन्याची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली जाऊ शकते. याशिवाय कंपन्यांची गुप्त माहिती यंत्रणेद्वारे लॉक करून त्याद्वारे कंपन्यांकडून खंडणी उकळण्याचे कामही 'एआय' यंत्रणेद्वारे केले जाऊ शकते. 'एआय'द्वारे होणारे संभाव्य सायबर हल्ले रोखण्यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने सायबर सुरक्षा यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर सामान्य नागरिकांनी त्यांची खासगी माहिती समाज माध्यमांवर अपलोड करताना काळजी घेण्याची आवश्यकता आहे. याशिवाय पोलीस व इतर सायबर यंत्रणांनाही काळानुसार अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे.

---

राजकीय

# अमेठी व वाराणसी; काँग्रेसचा जुगार


**उत्तर प्रदेश काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष अजय राय यांनी राहुल गांधींनी अमेठीतून आणि प्रियंका वाड्रा यांनी वाराणसीतून लोकसभा निवडणूक लढवावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचे म्हटले आहे. राहुल व प्रियंका दोघे बहीण-भाऊ उत्तर प्रदेशातून २०२४ मध्ये होणारी लोकसभा निवडणूक लढणार असल्यास काँग्रेस आपल्या सर्व शक्तिनिशी त्यांच्या पाठीशी उभी राहील, अशीही पुस्ती त्यांनी जोडली आहे. खरोखरच राहुल गांधी हे अमेठीतून आणि प्रियंका वाराणसीतून निवडणूक लढवतील का?, अशी चर्चा पक्षात सुरू आहे. उत्तर प्रदेश हा भाजपचा भक्कम किल्ला आहे. या किल्ल्याचे किल्लेदार मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आहेत. त्यामुळे राहुल आणि प्रियंका हे अमेठी व वाराणसीतून निवडणूक लढविण्याचे धाडस करणार नाहीत, असे वाटते. पण त्यांनी खरोखरच लढवायचे ठरवले, तर तो मोठा जुगार ठरेल.**

---------------------------

अमेठीतील मतदारांनी गेल्या वेळी चूक केली, ती चूक त्यांना येत्या लोकसभा निवडणुकीत सुधारायची आहे, म्हणूनच तेथील मतदार व पक्षाचे कार्यकर्ते राहुल गांधी यांनी अमेठीतून निवडणूक लढवावी अशी मागणी करीत आहेत, असे प्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी म्हटले आहे. अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी गेल्या वेळी (२०१९ मध्ये) उत्तर प्रदेशातील अमेठी आणि केरळमधील वायनाड अशा दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवली होती. भाजपच्या उमेदवार स्मृती इराणी यांनी त्यांचा अमेठीत पराभव केला. मात्र ते वायनाडमधून लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आले.

राहुल गांधी अमेठीतून सन २००४, २००९ आणि २०१४ अशा तीन निवडणुकांमधून लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आले होते. राहुल गांधी यांचे वडील व माजी पंतप्रधान राजीव गांधी हे सुद्धा अमेठी मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले होते. गेल्या निवडणुकीत काँग्रेसचा येथे पराभव झाल्यामुळे अमेठीची जागा इंडिया (इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इन्क्लुजिव्ह अलायन्स) नावाच्या विरोधी आघाडीतील मित्र असलेला समाजवादी पक्ष काँग्रेसला सोडेल का? हा सुद्धा एक कळीचा मुद्दा आहे. इंडिया या विरोधी आघाडीत काँग्रेस व सपा दोघेही आहेत व लोकसभा निवडणुकीसाठी 'इंडिया'ची उभारणी झाली आहे.

सन २०१७ मध्ये काँग्रेस आणि सपा यांची आघाडी विधानसभा निवडणुकीसाठी झाली होती, पण ती दोन्ही पक्षांना लाभदायक ठरली नाही. मोदी-योगींच्या झंझावातापुढे सपा व काँग्रेसचा धुव्वा झाला. सन २०१७ मध्ये उत्तर प्रदेश विधानसभेच्या ४०३ जागांसाठी झालेल्या



निवडणुकीत काँग्रेसचे केवळ ७ आमदार निवडून आले, तर सपाचे ४७ आमदार विजयी झाले. सन २०२२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे केवळ २ आमदार विजयी झाले. विशेष म्हणजे २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा केवळ एकच उमेदवार लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आला, त्या म्हणजे सोनिया गांधी रायबरेलीतून विजयी झाल्या. काँग्रेसचे बाकीचे सारे उमेदवार पराभूत झाले. उत्तर प्रदेशात काँग्रेस पक्ष शोधावा लागतो, अशी परिस्थिती आहे. अशा वातावरणात राहुल गांधी आणि प्रियंका वाड्रा २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक लढविण्याची हिम्मत दाखवतील का?

पुढील वर्षी होणारी लोकसभा निवडणूक सोनिया गांधी रायबरेलीतून लढवतील का?, हा सुद्धा कळीचा मुद्दा आहे. सोनिया, राहुल आणि प्रियंका तिघेही निवडणूक लढवणार असतील, तर भाजपला परिवारवादाचा मुद्दा अधिक प्रभावीपणे मांडण्याची आपसूकच संधी मिळेल. उत्तर प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी किंवा पक्ष कार्यकर्त्यांनी कितीही आळवणी केली तरी राहुल व प्रियंका या राज्यातून निवडणूक लढवायला तयार होतील का? हा यक्षप्रश्न आहे. २०१९ ची लोकसभा निवडणूक पराभूत झाल्यापासून राहुल यांनी अमेठीपासून फारकतच घेतली आहे. राहुल अमेठीकडे फिरकत नसल्याने त्यांचा जनसंपर्क राहिलेला नाही. याच अमेठीने राहुल गांधी यांना तीन वेळा खासदार म्हणून लोकसभेवर पाठवले पण त्यांनी मतदारांशी संपर्कच ठेवलाच नाही. त्यांची प्रतिमाही येथे कुणाला आकर्षित करेल, असे वातावरण नाही. आपल्या वडिलांची, आजीची पुण्याई हीच त्यांची पुंजी आहे, त्या जोरावरच ते निवडून येत होते. पण या पलीकडे त्यांनी या मतदारसंघाला काहीही दिले नाही. या उलट २०१९ मध्ये त्यांचा पराभव करून भाजपच्या स्मृती इराणी अमेठीतून खासदार झाल्या, केंद्रात मंत्रीही झाल्या. पण त्यांनी मतदारसंघाशी सतत संपर्क ठेवला आहे. मतदारसंघात केंद्र व राज्याच्या अनेक विकास योजना राबवल्या जात आहेत. अमेठीवासीयांच्या सुख-दु:खात सहभागी होणारी लोकप्रतिनिधी अशी स्मृती इराणी यांची तेथे प्रतिमा आहे. अमेठीची जनता राहुल यांना किती स्वीकारेल, याबद्दल साशंकता आहे. बहुसंख्य मुस्लीम मतदार असलेला केरळमधील वायनाड मतदारसंघ हा राहुल यांच्यासाठी अधिक सुरक्षित आहे, असे त्यांच्या निकटवर्तीयांना वाटते. प्रियंका पण वाराणसीतून लढेल, असे वाटत नाही. गांधी परिवार नेहमीच सुरक्षित मतदारसंघ निवडतो व नेहरू-गांधी नावाच्या पुण्याईवर वर्षानुवर्षे निवडणूक लढवतो. प्रियंका आपले राजकीय करिअर वाराणसीपासून सुरू करेल, याची सुतराम शक्यता वाटत नाही.

२०२४ची लोकसभा निवडणूक ही वेगळी असेल, असे सांगतात. गुजरातमधील भ्रष्ट कंत्राटदारांना उत्तर प्रदेशात मोठी कामे दिली आहेत, असा आरोप राय यांनी केला आहे. मात्र त्या कामांचा तपशील सांगण्यास त्यांनी नकार दिला. उत्तर प्रदेशमधील स्थानिक कंत्राटदारांना छोटी व किरकोळ कामे दिली जातात. गुजरातच्या कंत्राटदारांना मोठी कामे दिली जातात. राज्यातील तरुणांना सर्वसाधारण नोकऱ्या किंवा रोजगार दिला जातो. जिथे चांगली कमाई आहे, तिथे इतरांच्या नेमणुका केल्या जातात, असा आरोप काँग्रेस पक्ष करीत आहे.

राज्यात बेरोजगार प्रचंड आहेत. रोजगार नोकरीसाठी राज्यातील तरुणांना मुंबई, दिल्ली, चेन्नई किंवा बंगळूरुला जावे लागते, वर्षानुवर्षे ही परिस्थिती आहे. बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, सरकारी यंत्रणांचा गैरवापर यांनी उत्तर प्रदेशला वेढले आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राय सांगत आहेत. अर्थात हेच प्रश्न देशात सर्व राज्यांत आहेत. जिथे काँग्रेसची सत्ता आहे तिथे हे प्रश्न अधिक तीव्र आहेत. म्हणून हे मुद्दे रेटून काँग्रेसला यश मिळेल, असे ठामपणे सांगता येणार नाही. स्वत: राय यांनी तीन लोकसभा निवडणुका लढवल्या व तिन्ही वेळा ते पराभूत झाले. सन २०१४ आणि २०१९ मध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात लोकसभा निवडणूक लढवली होती. पण त्यांचा सणसणीत मतांनी पराभव झाला. सन २००९ मध्ये त्यांचा मुरली मनोहर जोशी यांच्यापुढे वाराणसीत सपाचे उमेदवार म्हणून पराभव झाला. पक्ष बदलला तरी ते एकदाही निवडणूक जिंकू शकले नाहीत आणि आता ते राहुल आणि प्रियंका यांना अमेठी व वाराणसीतून निवडणूक लढविण्याची गळ घालत आहेत. राहुल यांच्यासमोर स्मृती इराणी यांची अनामत ठेव जप्त होईल, अशी दर्पोक्ति करीत आहेत. प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून ते राहुल व प्रियंका यांना हरभऱ्याच्या झाडावर चढवत आहेत. दोघांना भाजपच्या विरोधात जुगार खेळण्याचा आग्रह करीत आहेत. धन्य ते काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष...

**- डॉ. सुकृत खांडेकर**

---

टुडेज् ब्लॉग

# हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद

आज २९ ऑगस्ट, राष्ट्रीय क्रीडा दिन. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून मेजर ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील वर्षी खेलरत्न पुरस्काराला देखील मेजर ध्यानचंद यांचे नाव देण्याची घोषणा करून त्यांच्या कार्याचा यथोचित असा गौरव केला आहे. ज्या खेळाडूंनी वर्षभर सर्वोत्तम कामगिरी करून जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे अशा खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो.

आजच्याच दिवशी म्हणजे २९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळत असे. हॉकीतील त्यांचे कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरू होते. पुढे मेजर ध्यानचंद हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी हाच त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या तर केवळ एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. मेजर ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरचे नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानात कोणी खेळत नाही असेच वाटायचे.



चेंडू त्यांच्या स्टीक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती. हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ ( एमस्टरडॅम ) १९३१ ( लॉस अँजेलीस ) १९३६ ( बर्लिन ) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यात झालेल्या ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांनी एकहाती विजय मिळवून दिला होता. ही लढत पाहायला जर्मनीचे हुकूमशहा एडॉल्फ हिटलर उपस्थित होते. ध्यानचंद यांच्या खेळाने ते चांगलेच प्रभावित झाले. ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा एडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती ; पण देशप्रेमी आणि स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीस मध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले. त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान खेळाडूचे निधन झाले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे.

**- श्याम ठाणेदार**


---

जन्म हा अखेरचा

## वाणी संतांची

ऐसिया दृष्टी जो विवेकी । पार्था तो एकाकी । सहजें अपरिग्रही जो तिहीं लोकीं । तोचि म्हणौनि ।।

पार्था, अशा दृष्टीने जो विचार करतो, तोच अद्वितीय व तोच तिन्ही लोकी संग्रह न करणारा, असे जाण.



ऐसियें असाधारणें । निष्पन्नाचीं लक्षणें । आपुलेनि बहुवसपणें । श्रीकृष्ण बोले ।।

अशा प्रकारे आपल्या स्वताच्याहीपेक्षा विशेष गौरवाने श्रीकृष्णांनी साधूची मुख्य लक्षणे सांगितली.

जो ज्ञानियांचा बापु । देखणेयांचे दिठीचा दीपु । जया दादुलयाचा संकल्पु । विश्व रची ।।

जो सर्व ज्ञानी लोकात श्रेष्ठ व सर्व पाहणाऱ्यांच्या दृष्टीचा प्रकाशक आणि ज्या समर्थाच्या केवळ संकल्पाने विश्वाची रचना होते,

प्रणवाचिये पेठे । जाहलें शब्दब्रह्म माजिठें । तें जयाचिया यशा धाकुटें । वेढूं न पुरे ।।

ॐकाराच्या बाजारात जे शब्दब्रह्मरूप उत्तम वस्त्र निघाले ते त्याच्या यशास आच्छादण्यास पुरत नाही; म्हणजे श्रीकृष्णाचे तर नाहीच, परंतु त्याच्या यशाचेही वेद वर्णन करू शकत नाहीत;

जयाचेनि आंगिकें तेजें । आवो रविशशीचिये वणिजे । म्हणौनि जग हें वेसजे । वीण असे तया ।।

ज्याच्या अंगाच्या तेजाने सूर्य आणि चंद्र यांच्या व्यवहारास प्रतिष्ठा येते, तेव्हा हे जग त्याच्या आधाराशिवाय आहे काय?

हां गा नामचि एक जयाचें । पाहतां गगनही दिसे टांचें । गुण एकैक काय तयाचे । आकळशील तूं ।।

पहा की, ज्याच्या नुसत्या नावापुढे गगन तुच्छ दिसते, असे याचे किती गुण तू जाणशील?

म्हणौनि असो हें वानणें । सांगों नेणों कवणाचीं लक्षणें । दावावीं मिषें येणें । कां बोलिलों तें ।।

म्हणून ही स्तुती आता पुरे. कारण अशा लक्षणांनी युक्त जो श्रीकृष्ण भगवान तो ज्या साधूचे वर्णन करतो, त्याची लक्षणे आम्ही सांगू शकत नाही; परंतु काही सांगावी म्हणून सांगितली.

---

जनमानस

## नात्याचे धागे तुटत चालले

चिकोडी येथील एक वडिलांच्या मृत्यूची हकीगत नुकतीच वाचण्यात आली. अलीकडे मुलांना आई वडील चांगले शिक्षण देतात . प्रसंगी पोटाला चिमटा देऊन हे शिक्षण केले जाते . शिक्षण मिळताच मुले किंवा मुली परदेशी जातात व तेथील वातावरणात रमतात. इकडे आईवडील वृद्ध झालेले असतात व मदतीची जरुरी भासते. अशा अत्यंत अवघड परिस्थितीत मुले आई वडिलांकडे लक्ष देत नाहीत. अशा प्रकारची उदाहरणे आपण समाजात पाहतो. पुणे शहरातील एक निवृत्त बँक अधिकारी यांना अर्धांगवायु झाला. त्यांचा मुलगा दक्षिण आफ्रिकेत आहे . मुलगी कॅनडात नोकरी करते. दिवसापूर्वी हे बँक अधिकारी अतिशय आजारी पडले व त्या आजारात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पोलिसांनी मृत्यूचे वृत्त त्यांच्या मुलाला तसेच मुलीला कळविले व मृतदेह ताब्यात घेण्यासाठी विनंती केली . तेव्हा त्यांनी त्यास साफ नकार दिला . त्यांचा माझा काही संबंध नाही . तुम्हाला आम्ही उपचार द्या म्हणून सांगितले नाही . उगाच आम्हाला त्रास देऊ नका . तुम्हाला पुढील कार्य करावयाचे करा अन्यथा त्या मृतदेहाचे काहीही करा . हे उत्तर ऐकून पोलिसांनी त्या मृतदेहाचे अंत्यसंस्कार केले . अशा घटना समाजात वारंवार होत आहेत . असे का व्हावे ? मुले इतकी निर्दयी का व्हावीत ? आपल्या जन्म दात्या आई वडिलांविषयी मुलांची काही कर्तव्ये असतात .ती का पाळली जात नाहीत ? असे अनेक प्रश्न या घटनेतून निर्माण होतात एकूणच नात्याचे धागे तुटत चालले आहेत . ते धागे जोडण्याचे काम समाजधुरीणांनी करावयास हवे असे वाटते

**- शांताराम वाघ पुणे**

## सुरक्षित प्रवासासाठी हेल्मेट वापरणे गरजेचे...!

सद्या दुचाकी अपघाताचे प्रमाण वाढले असून त्यामध्ये प्रामुख्याने डोकीला गंभीर इजा होवून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे प्रत्येकाने हेल्मेट घालून दुचाकी चालवावी यासाठी पोलिस वरचेवर प्रयत्न करतांना दिसतात मात्र याकडे दुर्लक्ष करुन दुचाकीस्वार विना हेल्मेटचे वाहन चालवून आपला लाख मोलाचा जीव गमावून बसतात देशांतील काही राज्यांत हेल्मेट सक्ती आहे तर काही ठिकाणी नाही मात्र प्रत्येकाने हेल्मेट वापरणे काळाची गरज आहे हे अपघातामध्ये घडलेल्या घटनांवरुन अधोरेखित झाले आहे. आज झपाट्याने वाहनांची संख्या वाढत आहे. त्याच प्रमाणात अपघातांची संख्याही वाढत आहे. आपण वाहन चालवताना सुरक्षित असतो तोपर्यंत हेल्मेटचे महत्व कळत नाही मात्र अपघाताने डोक्याला गंभीर इजा होवून मृत्यू होतो त्यावेळी मात्र हेल्मेटचे महत्व कळते हे वास्तव आहे हेल्मेटचा वापर करणे गरजेचे आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

---

# संगीत अध्यापनाचे विचारधन

**सोलापूरच्या संगीत क्षेत्रात सर्वांना सुपरिचित असलेले नाव म्हणजे सरगम संगीत विद्यालयाच्या संस्थापिका जेष्ठ गायिका,शिक्षिका सौ. सुषमा कुलकर्णी. त्यांनी अलिकडेच वयाची ७१ वर्षे पूर्ण केली. या निमित्ताने 'संगीताचे शालेय अध्यापन' या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले,त्यानिमित्त...**

सुषमाताईंनी अनेक वर्षे शालेय माध्यमातून संगीताचे अध्यापन केले.अनेक विद्यार्थी घडवले. अनेक स्पर्धांमधून शाळेस पुरस्कार मिळवून दिले. जिल्हास्तरीय शिबिरे घेतली. आजही सरगम संगीत विद्यालयातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य अथकपणे सुषमाताई करत आहेत. असेच खूप मोठे कार्य संगीताचे शालेय अध्यापनामार्फत त्यांनी केले. या सर्व सांगीतिक कार्याचे श्रेय सुषमाताई यांचे गुरू कै. भालचंद्र पंचवाडकर, कै दुर्गाताई,कै. दिगंबरबुवा तसेच त्यांच्या कुटुंबियांना देतात तसेच आतापर्यंतच्या संगीतिक प्रवासातील त्यांचा प्रचंड मोठा अनुभव आणि संगीताचा त्यांचा गाढा व्यासंग याची ओळख आपल्याला या पुस्तकामुळे होते. याचा प्रत्यय मला अनेकवेळा त्यांच्या भेटी दरम्यान होतो.

सुषमाताई लिखित 'संगीताचे शालेय अध्यापन ' हे अप्रतिम पुस्तक त्यांनी संगीत क्षेत्रास समर्पित केले आहे.या पुस्तकामध्ये शालेय अध्यापना बरोबरच वैदिक संगीतापासून ते आधुनिक काळापर्यंतचा मागोवा घेतला आहे. यामधून एकेक सांगीतिक विषय आणि संगीताचे शालेय अध्यापन यांचा समन्वय साधला आहे.याशिवाय शालेय शिक्षणात संगीताचे महत्त्व, शिक्षण, त्यांचा अभ्यासक्रम, तसेच कोणकोणत्या शालेय संस्था मधून संगीताचे शालेय अध्यापन नेमके कोणत्या पद्धतीने होत आले,याबद्दलचे त्यांचे विचार अत्यंत साध्या, सोप्या भाषेत सुषमाताईंनी मांडले आहे.

संगीताचे शालेय अध्यापन करताना वयोगटानुसार कसे संगीताचे मार्गदर्शन बदलत जाते? त्यानुसार शिक्षकाला स्वत:मध्ये, विद्यार्थ्यांमध्ये,शिक्षण पध्दतीमध्ये आणि संगीतामध्येही म्हणजे अगदी बडबड गीते,चिमण गाणी इत्यादी,






असा काय बदल करावा लागतो?कारण बदल हे विद्यार्थ्यांची बौद्धिक,मानसिक क्षमता,आकलन शक्ती यांचा विचार करून मगच करावा लागतो.त्यामुळे याचे अत्यंत समर्पक शब्दात सुषमाताईंनी विश्लेषण केले आहे.

याशिवाय शासकीय नियमानुसार होत गेलेले या अभ्यासक्रमातील बदल आणि वयोगटानुसार संगीत शिक्षण पद्धती, परीक्षा पध्दती,त्यांची उद्दिष्टे ही विचारपूर्वक दर्शविली आहेत तसेच विद्यार्थ्यांना सामूहिक आणि वैयक्तिक स्तरावर त्यांच्यामध्ये सांगीतिक कौशल्ये वृध्दिंगत होऊन संगीताची आवड उत्पन्न होण्यासाठी सुषमाताईंनी संगीताचे अनेक उपक्रम उत्तमप्रकारे राबविले. यामध्ये विद्यार्थ्यांचा सूर,वाद्य वादन,आणि ताल उत्तमप्रकारे सांभाळता येतो? त्यातून विद्यार्थी कसा घडत जातो,याचे उत्तम मार्गदर्शन या पुस्तकामधून संगीत शिक्षकास,शालेय संस्थेस,संगीत अभ्यासकांस ताईंनी केले आहे.या संदर्भातील येणाऱ्या अडचणी, आणि त्यावर उपाय ही मार्मिक शब्दात सांगितले आहे.

तसेच अनेक शालेय संस्था,संगीत शिक्षकांचा शालेय संगीत अध्यापनाचा अनुभव, त्यांची शिकविण्याची पध्दत याचाही गोषवारा अगदी सहजपणे सुषमाताईंनी येथे घेतला आहे.अशा प्रकारचे सोलापूरच्या संगीत क्षेत्रातील हे पहिलेच पुस्तक. त्यांच्या अनुभवाच्या तिजोरीतून शालेय संगीत अध्यापनाचे एकेक विचारधन अत्यंत आनंदाने सुषमाताईंनी आपल्याला सुपूर्द केले. त्यांच्या अतीव स्नेहाने त्यांनी त्यांच्या या पुस्तकाबद्दल चार शब्द लिहिण्याची मला संधी दिली, हा त्यांचा मोठेपणा आहे. प्रत्येक संगीत अभ्यासकाने ,संगीत शिक्षकाने हे पुस्तक आवर्जून वाचावे,त्याचा अभ्यास करावा, शालेय संस्थाच्या संग्रही सुद्धा हे पुस्तक असावे.इतकी त्याची उपयोगिता आणि इतके सुंदर सांगीतिक विचार या पुस्तकाच्या रूपाने सुषमाताईंनी आपल्यापुढे मांडले आहेत.या पुस्तकास माझ्या स्वरमयी शुभेच्छा

**- स्मिता देशपांडे,सोलापूर**
**९४०३७०१९३५**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## पौराणिक पुराण मधील पट्टाधिकार सोहळा उत्साहात

**अक्कलकोट** : येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थानात श्रावणमासनिमित्ताने आयोजित हानगल श्री गुरूकुमार शिवयोगी यांच्या चरित्रावरील पौराणिक पुराण मधील पट्टाधिकार सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. अध्यक्षस्थानी वीरशैव लिंगायत विरक मठाचे मठाधिपती श्री. म. नि. प्र. बसवलिंग महास्वामीजी हे होते. यावेळी हत्तीकणबस मठाचे मठाधिपती प्रशांत देवरु, पुराणीक चन्नमल्ल स्वामी (गंगाधर स्वामी मठ, तोळणूर), हार्मोनियम सेवक अशोककुमार देगलमडी (गदग), तबला सेवा बसवराज हुगार (बंदली गदग), अजनी मंडल उपस्थित होते. प्रारंभी पौराणिक कथेतील सुमारे शेकडो वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे पट्टाधिकार सोहळा झाला होता त्याप्रमाणे अगदी हुबेहूब पट्टाधिकार कार्यक्रम मोठ्या मंगलमय वातावरणात करण्यात आले. यावेळी भाविकांनी श्री महास्वामीजी यांचे जयजयकार केला. या मंगल प्रसंगी हार्मोनियम सेवक अशोककुमार देगलमडी (गदग) यांनी तबला सेवक बसवराज हुगार (बंदली गदग) यांच्या साथसंगतीने पट्टाधिकार गीत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. शेवटी उपस्थितांना प्रसिध्द व्यापारी सुर्यकांत बिराजदार परिवार च्या वतीने प्रसाद वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास माजी नगराध्यक्षा महानंदा स्वामी, देवस्थानचे अध्यक्ष शिवनिंग स्वामी, विश्वस्त प्रकाश उण्णद, विजयकुमार लिंबितोटे, राजशेखर नागुरे, माजी मुख्याध्यापक सुभाष आंदोडगी, भिमाशंकर करकी, राजशेखर उंबराणीकर, कल्याणी पाटील, तात्यासाहेब समाने, धुळप्पा भजे, विद्याधर गुरव, महांतेश्वर कोंपा, विक्रांत गोरे, शिवानंद बिंदगे, महानंदा उडचाण, मल्लम्मा पसारे, राजश्री कलशेट्टी, शकुंतला कलशेट्टी, कलप्पा सोमेश्वर, वेदमूर्ती सिध्दाराम हिरेमठ, मल्लिनाथ पाटील, मल्लिनाथ कुंभार, विरुपाक्ष कुंभार, मल्लिकार्जून अकनबळग भजनी मंडळ आदिंसह असंख्य भाविक उपस्थित होते.



## बौद्ध महासभेच्या मोडनिंब शाखेला जगताप यांच्याकडून धम्मदान

**सोलापूर** : मोडनिंब येथे माजी शिक्षण अधिकारी विद्याधर जगताप व त्यांच्या पत्नी विमल जगताप यांनी भारतीय बौद्ध महासभा मोडनिंब शाखेला सदिच्छा भेट देऊन धम्मदान दिले. दि २७ रोजी सायं ५ वा. सभागृहामध्ये सतरंजींचे वाटप केले. कार्यक्रमात माढा तालुका उपाध्यक्ष विश्वास ताकतोडे यांनी त्रिशरण पंचशील घेवून कार्यक्रम ची सुरुवात केली. या प्रसंगी माढा तालुका पर्यटन विभाग सारिका बनसोडे, माढा तालुका महिला प्रमुख अरुणा ताकतोडे, मोडनिंब शहर सदस्य ज्योती ओहोळ, मोडनिंब शहर सदस्य उर्मिला ओहोळ, मोडनिंब शहर सदस्य बनसोडे, कोमल ओहोळ व इतर महिला यांनी परिसर सुशोभित करून कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले. या कार्यक्रम प्रसंगी प्रकाश ओहोळ, नागनाथ ओहोळ, रोहिदास ओहोळ, बापू थोरात, महेश शिंदे, गौतम शिंदे, संदीप शिंदे, पोमा ओहोळ, कुंदन बनसोडे उपस्थित होते. शेखर सुर्वे यांनी पाहुण्यां गौरव केला. अर्जुन बनसोडे यांनी पाहुण्यांच्या कार्याची माहिती देऊन धम्म कार्यास शुभेच्छा दिल्या. सचिव सुरेंद्र शिंदे यांनी आभार मानले.

## शंकर कांबळे यांचे निधन



मोडनिंबः अरण येथील खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शंकर कांबळे( वय ९७) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले.त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे.

# अद्याप ७५ टक्के लोकांनी कर भरला नाही

### महापालिका प्रशासन आक्रमक;१ सप्टेंबरपासून कारवाई करणार

**सुराज्य/सोलापूर**

महापालिकेचा कर भरण्यासाठी आता प्रशासनाने ३१ ऑगस्टपर्यंत डेडलाईन दिली आहे. या काळात कर भरणाऱ्यांना पाच व सहा टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली आहे. मात्र त्यानंतर त्यानंतर धडक कारवाई करून नळ कनेक्शन तोडणे, मालमत्ता सील करण्याची कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.दरम्यान, महापालिकेने



मिळकत कर भरण्यासंदर्भातील बिले मिळकतदारांना दिली आहेत, पण अद्याप ७५ टक्के लोकांनी बिले भरलेली नसल्याचे उघड झाले आहे.

#### तर मालमत्तेवर कराचा बोजा चढवणार

सोलापूर शहरातील अनेक मिळकतदारांनी महापालिकेचा कर भरलेला नाही. अनेकांकडे थकबाकीची मोठी रक्कम आहे. त्यामुळे आता सर्वाधिक थकबाकी असलेल्या खुल्या जागांचा जाहीर लिलाव किंवा त्या मालमत्तेवर बोजा चढविण्याची कारवाई केली जाणार आहे, असे महापालिका प्रशासनाने कळवले आहे.

#### मुदतीत कर भरून सहकार्य कराः गाडेकर

३१ ऑगस्टपर्यंत कर भरणाऱ्यांना पाच व सहा टक्क्यांपर्यंत सवलत दिली आहे. १ सप्टेंबरपासून ही सवलत बंद होणार असल्याने नागरिकांनी मुदतीत कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कर संकलन प्रमुख युवराज गाडेकर यांनी केले आहे.

महापालिकेच्या उत्पन्नातूनच शहरातील नागरिकांना सोयी-सुविधा पुरवणे शक्य आहे. दरवर्षी महापालिकेला करातून ३०८ कोटी रुपये अपेक्षित आहेत. मात्र, अनेकजण कर भरत नाहीत आणि त्यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. महापालिकेच्या तिजोरीत पैसा शिल्लक नसल्याने अनेक शासकीय योजना, प्रकल्पांचा हिस्सा भरायला सुद्धा महापालिकेकडे पुरेसा निधी नाही, ही वस्तुस्थिती आहे.

शहरातील दोन उड्डाणपुलांच्या भूसंपादनासाठी महापालिकेला इन्फ्रा'कडून कर्ज घ्यावे लागले आहे. पण, आता प्रत्येक मिळकतदारांनी नियमित व वेळेवर कर भरावा, याद्दष्टिने महापालिकेचे प्रयत्न सुरु आहेत. तरीदेखील कर न भरल्यास आता संबंधितांवर कारवाई केली जाणार असून त्यांचे नळ कनेक्शन कापले जाणार असून व्यावसायिकांचा गाळा, दुकान सील केले जाणार आहे.



## जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा अन्यथा शिवसेना लोकप्रतिनिधींना अडविणार : हाके

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील पिलीव, सुळेवाडी, कारखेल, जळभावी, गोरडवाडी, गारवाड भागातील टंचाईग्रस्त वाड्या वस्त्यावर जाऊन शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते लक्ष्मण हाके यांनी भेटी घेऊन त्याच्याशी चर्चा करून दुष्काळी भागातील व्यथा जाणून घेतल्या.

जिल्ह्यात चारा डेपो सुरु केले नाहीत व संपूर्ण सोलापूर जिल्हा दुष्काळी म्हणून जाहीर केला नाही तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेनेच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात तीव्र आंदोलन केले. या आंदोलनात शेतकरी, मेंढपाळ यांच्यासह युवासेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष राऊत, युवा सेना तालुका प्रमुख सुभाष काकडे, युवा सेना उपतालुकाप्रमुख निलेश कांबळे, दत्तात्रय साळुंखे, दुर्वा आडके, संदीप कदम, शिवसेना शहर प्रमुख योगेश देशमुख, युवा सेना शहरप्रमुख देवा लोखंडे, उमाजी बोडरे, ॲड. ओम कालेकर, ज्ञानदेव लेंगरे, निशांत दोलताडे, रामचंद्र सुळे, प्रवीण माने, बंडू नरळे, जिवन लोखंडे, सुनील मिसाळ, अजय नाईकनवरे, अर्जुन लोखंडे उपस्थित होते.

## कुसमोड येथे भरदिवसा बिबट्याचा शेळीवर हल्ला

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड परीसरात गेल्या सहा महीन्यापासुन बिबट्याचा वावर आहे. यापुर्वी जनावरे,शेळया,मेंढया यांच्यावर बिबट्याने हल्ला केला होता त्यातील काही खाऊन टाकली होती.आज दुपारी तिनच्या सुमारास अशोक नाना राजगे हे लवटेवस्ती याठिकाणी आपल्या शेळया चारत असताना भरदिवसा बिबट्याने शेळीवर हल्ला केला.

मात्र या ठिकाणी माणसांचा वावर असल्याने लगेच आरडाओरडा केल्यामुळे बिबट्या शेळीला जखमी करुन पळुन गेला.यामुळे सध्या कुसमोड परीसरातील शेतकऱ्यांनमध्ये प्रचंड भितीचे वातावरण आहे. सदरच्या बिबट्याचा वावर हा गेली सहा महीन्यापासुन कुसमोड परीसरातच आहे.मात्र सदरचा बिबट्या पकडणयात वनविभागाला अदयापही यश आलेले नाही.

## होटगीचे तलाठी शिवप्पा कोळी यांचा जामीन अर्ज फेटाळला

### आरोपी कोळी यांना अटक करणे गरजेचे असा आदेश पारितही केला

**सुराज्य/अक्कलकोट**

होटगीचे मठाधीश यल्लल्लिंग गुरुनाथ व्हनमाने यांना मदत केल्याप्रकरणी होटगीचे तत्कालीन तलाठी शिवप्पा भिमशा कोळी (रा. आहेरवाडी) यांचा जामीन अर्ज मे. सत्र न्यायाधीश यांनी फेटाळला. व आरोपी शिवप्पा कोळी यांना तात्काळ अटक करावी लागेल असा आदेशही पारित केलेला आहे.

यल्लल्लिंग व्हनमाने व इतर आरोपीविरुद्ध मठाची प्रॉपर्टी ही बेकायदेशीररित्या विक्री केली व त्यांचा वापर स्वतःच्या स्वार्था करीता वापर केल्यामुळे व खोटे कागदपत्रे तयार केल्याने तसेच संस्थेची मिळकत तत्कालीन तलाठी शिवप्पा कोळी याला हाताशी धरून बेकायदेशीर रित्या स्वतःचे नावे करून घेऊन मठाची मिळकत ही समाजातील व्यक्तिंच्या हितासाठी न वापरता स्वतःसाठी वापर केला. वळसंग पोलीस स्टेशन येथे सदर आरोपी यल्लल्लिंग गुरुनाथ व्हनमाने व इतर साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्याप्रकरणी यातील फरार आरोपी यल्लल्लिंग महाराज यास पोलिसाने अटक केले असता सदर गुन्ह्यातील सह आरोपी तत्कालीन तलाठी शिवप्पा कोळी रा.आहेरवाडी यांनी मे.सत्र न्यायालय सोलापूर अटकपूर्व जामीन होऊन मिळण्याकरिता अर्ज दाखल केला असता सदरचा अर्ज न्यायालयाने फेटाळला असून तात्काळ आरोपींला अटक होणे गरजेचे असल्याचेही आदेश पारित केलेला आहे. त्यास वळसंग पोलीस स्टेशन येथील तपासिक अंमलदार तथा उपनिरीक्षक उस्मान शेख यांनी सदर तलाठ्यास अटक करणे गरजेचे असल्याचे कोर्टात हजर राहून सांगितले. तसेच सरकार वकील जन्नू व मूळ फिर्यादीतर्फे ॲड कपाळे यांनी मे. कोर्टास त्यांचे युक्तिवाद सादर केला होता. सदरचा जामीन अर्ज हा सोलापूर येथील मे. सत्रन्यायाधीश कविता डी शिरभाते यांनी फेटाळला. त्याप्रकरणी सरकार पक्षातर्फे ॲड जन्नु मूळ फिर्यादीतर्फे अँड धानव्या बसराज कपाळे , ॲड धनश्री शिवानंद स्वामी , व आरोपीतर्फे आर.आर. पवार व मूळ फिर्यादी तर्फे आम आदमी पार्टीचे आनंद जाधव , व पोलीस अधिकारी उस्मान शेख यांनी काम पाहिले.

#### संपतीची ईडीकडून चौकशी करावी : सचिन व्हनमाने

शिवप्पा कोळी तलाठी पदावर असताना अनेकांचे फसवणूक करून गडगंज संप्पती कमवलेली आहे. त्याच पैशातून शेती, घरे, बंगले, जागा, सोनेचांदी आदी घेतले असून ते नातेवाईकांच्या नांवावर केलेली आहे. तरी त्यांनी कमवलेल्या बेइनामी संप्पतीचे सीबीआय किंवा ईडी करून चौकशी करावी अशी मागणी आम आदमी पार्टीचे सचिन व्हनमाने यांनी केली आहे.

## गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांचा सत्कार

### श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात झाला सन्मान

**सुराज्य/सोलापूर**

महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) नियुक्ती झाल्याबद्दल शेखर मुंदडा यांचा सोलापूरकरांतर्फे सत्कार करण्यात आला. नई जिंदगी येथील श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात मठाधिपती प. पू. श्रो. ब्र. ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या हस्ते हा सन्मान झाला.

प्रारंभी गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या हस्ते गोपूजन करण्यात आले. यानंतर श्री राजराजेश्वरी देवीची आरती करण्यात आली. मठाधिपती प. पू. श्रो. ब्र. ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या हस्ते आणि प. पू . श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री. मुंदडा यांचा सन्मान



झाला. श्रीफळ, शाल आणि श्रीयंत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी श्री. मुंदडा म्हणाले, गोसेवा आयोगाच्या माध्यमातून गोवंशाच्या संवर्धनाचे आणि संगोपनाचे कार्य करण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यभर याबाबत मोठ्या प्रमाणात कार्य करण्यात येणार असल्याचेही गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा म्हणाले.

याप्रसंगी प. पू . श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी, माजी महापौर शोभा बनशेट्टी, सुरेश पाटील, सोलापूर महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते श्रीनिवास करली, रवींद्र मणियार, श्रीशैल हत्तुरे, महादेव कोगनुरे, सोमनाथ केंगनाळकर, अजित पाटील, संतोष हुल्ले, श्रीनिवास पुरुड, सुनिल बळी आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून तत्कालीन सीईओ दिलीप स्वामी यांचे कौतुक

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी पंढरपूरच्या आषाढी वारीमध्ये योग्य आणि उत्तमरीत्या नियोजन केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे स्वतः च्या सहीचे पत्र पाठवून कौतुक व अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्र्यांनी लिहिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे की, पंढरीची वारी महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेची ओळख आहे. महाराष्ट्राचे आराधा श्री विठ्ठल आणि रखुमाई यांच्या दर्शनासाठी आषाढी एकादशीच्या निमित्ताने महाराष्ट्रासह शेजारील राज्यातील लाखो वारकरी पंढरीत दाखल होतात. या वारकरी बंधू-भगिनींची बारी सुखकर व्हावी यासाठी आपण आपल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसमवेत उत्तम नियोजन केले. त्यासाठी आपल्या सर्वांचे सांघिक प्रयत्न कारणीभूत ठरले. या यशस्वी नियोजनासाठी आपल्या सर्वांचे मनापासून अभिनंदन,

आपल्या या योगदानामुळे यंदाची वारी हो यशस्वीरित्या पार पडली. भविष्यातही आपण असेच उत्तम काम करून महाराष्ट्राच्या प्रशासनाचा गौरव वाढवाल, अशी अपेक्षा करतो.

# फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

### प्राचार्य येवलेकर, डॉ. नारायणकर, प्रा. मंजुनाथ, प्राचार्य कुंभार, सौ. शेख, मुख्याध्यापक जगताप व नागणे मानकरी

**सुराज्य/सोलापूर**



प्राचार्य रुपश्री येवलेकर



प्रा. डॉ. दिपक नारायणकर



प्रा. गोपीका मंजूनाथ



प्राचार्य रविशंकर कुंभार



सौ. साजिदा शेख



मुख्याध्यापक रविंद्र जगताप



श्री. वसंत नागणे

सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने दिले जाणारे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाले आहेत.

यावर्षी पुरस्काराचे मानकरी म्हणून प्राचार्य रूपश्री येवलेकर (दि मेरी बी. हार्डिंग डी.एड् कॉलेज सोलापूर), प्रा. डॉ. दीपक नारायणकर ( सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, सोलापूर), प्रा. गोपिका मंजुनाथ (वि. गु. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर), प्राचार्य रविशंकर कुंभार ( नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सोलापूर), साजिदा फैय्याज शेख ( संभाजीराव शिंदे प्रशाला विडी घरकुल, सोलापूर), मुख्याध्यापक रवींद्र जगताप ( मूकबधिर निवासी शाळा, कुर्डूवाडी), वरिष्ठ शिक्षक वसंत नागणे ( रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल कुरुल, तालुका मोहोळ) यांची निवड झालेली आहे.

सन्मानपत्र, गौरवचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी प्र.कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांच्या हस्ते, श्री. स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी वळसंगचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी सकाळी १०:३० वाजता वि.गु.शिवदारे आर्टस्, कॉमर्स व सायन्स कॉलेजच्या सेमिनार हॉल, जुळे सोलापूर येथे होणार आहे. अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे समन्वयक डॉ. श्रीकांत येळेगावकर, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील व फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली यांनी दिली आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered contractors of MSETCL. **RFx No. 7000028382 E-Tender No.** EE/400kV/R.S/DN/LBT/-Tender:03/ 2023-2024, **Particulars:** Work of Maintenance/Servicing/ Overhauling of 400 kV and 220 kV Center Break Isolators at 400 kV R.S. Division, Lamboti. **Estimated Cost:** Rs. 9,31,531/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs. 9,315/- **Tender Cost:** Rs. 500/- + 5% GST i.e. Rs. 525/- **Sale Period:** 28.08.2023 to 04.09.2023 **Last Date of Submission:** 04.09.2023 up to 23:59 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 05.09.2023 at 12:00 Hrs (If possible). **Contact Person:** Executive Engineer - 8554995020.

For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400 kV R.S. Div., Lamboti**

**महाराष्ट्रशासन**
**कार्यकारीअभियंतायांचेकार्यालय,**
**सार्वजनिक बांधकामविभाग क्र.२,सोलापूर**
**सातरस्ता,कारीगरपेट्रोलपंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**e-mail**-solapur2.ee@mahapwd.comदुरध्वनी / फॅक्स क्र.(०२१७) २३१२३०२
**ई- निविदा सुचनाक्रमांक १५ सन२०२३-२४(ऑनलाईन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर** योग्य त्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा-प्रणालीद्वारे(ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.२, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.तसेच सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल झाल्यास खालील नमूद केलेल्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करण्यात येईल.
**टिप** - वरील ई-निविदा सुचनामध्ये एकूण ०७ कामांचा समाविष्ट असून वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर दि.२८/०८/२०२३ पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | मोहोळवैरागरस्तारा.मा. १४१ कि.मी. २२०/०० ते२२१/४०० मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि. सोलापूर | **१५९.७३ लक्ष** |
| २ | भूमवारदवाडीशेंद्रीरा.मा. ६२ कि.मी. १६९/३०० ते१७१/८०० मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि. सोलापूर | **१९१.८९ लक्ष** |
| ३ | अंजनगाव श्रीपतपिंपरी कोरफळे पानगाव साकत पिंपरी ते प्रजिमा 30 ला जोडणारा रस्ता प्रजिमा 22 कि.मी. 26/00 ते 29/00 मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि. सोलापूर | **१९९.९२ लक्ष** |
| ४ | बार्शी अरणगाव धोत्रे ते पिंपळगाव ते घारी रस्ता प्रजिमा 136 कि.मी. 9/00 ते 14/00 मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि. सोलापूर | **१५९.८१ लक्ष** |
| ५ | अंजनगाव श्रीपतपिंपरी कोरफळे पानगाव साकतपिंपरी ते प्रजिमा 30 ला जोडणारा रस्ता प्रजिमा 22 कि.मी. 22/00 ते 26/00 मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि. सोलापूर | **२१२.१० लक्ष** |
| ६ | आगळगाव उबरगे भनसाळे खडकोणी कोरेगाव रस्ता प्रजिमा 120 कि.मी. 10/00 ते13/800 मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि.सोलापूर | **२१२.०० लक्ष** |
| ७ | **अंजनगाव श्रीपतपिंपरी कोरफळे पानगाव साकत पिंपरी ते प्रजिमा ३० ला जोडणारा रस्ता प्रजिमा 22 कि.मी. 9/00 ते 10/700 मध्ये सुधारणा करणे, ता. बार्शी, जि. सोलापूर** | **१६०.०२ लक्ष** |

१) http://mahapwd.gov.in
२) http://mahatenders.gov.in
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकामविभाग क्र.२, सोलापूर कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र. साबांवि-२/लेखा/निविदा/२७९१ / सन२०२३**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, **सार्वजननिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर**
सार्वजनिक बांधकाम विभाग क.२, सोलापूर
दिनांक -१८/०८/२०२३
DGIPR/ROC/2023-24/5/C3130

**कार्यकारी अभियंता**
**सा. बां. विभाग क्र. २, सोलापूर.**

# महावितरणकडून ग्राहकांना करंट; बसणार ८८५ रूपयांचा भुर्दंड

**सुराज्य/सोलापूर**

लाईट बिल चेकद्वारे भरताना वीज ग्राहकांना आता अधिक काळजी घ्यावी लागणार आहे. चेक बाऊन्स झालाच तर ग्राहकाला तब्बल ८८५ रुपये भुर्दंड बसणार आहे. महावितरणने तसा निर्णय घेतला आहे.

महावितरणचे हजारो ग्राहक त्यांचे लाइट बिल चेकद्वारे भरतात. मात्र, त्यापैकी हजारो चेक दरमहा बाऊन्स होतात. त्यामुळे महावितरणला अनेकदा त्रास सहन करावा लागतो. त्यावर तोडगा म्हणून महावितरणने पुढील महिन्यापासून ज्या ग्राहकांचा चेक बाऊन्स होईल त्यांना ८८५ रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

चेक स्थानिक बँकेचा असावा. चेकसोबत पावती स्थळप्रत जोडावी, स्टॅपल करू नये. चेक पुढील तारखेचा नसावा.बाऊन्स झालेल्या एकाच चेकद्वारे अनेक वीज बिलांचा भरणा केल्यास प्रत्येक बिलासाठी दंडात्मक रक्कम लावण्यात येत आहे.चेकद्वारे वीज बिल भरण्याची सोय सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात येत आहे. चेकवर चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, चुकीचे नाव, खात्यात संबंधित रक्कम नसणे आदी कारणांवरून चेक बाऊन्स होत आहेत. चेक दिल्यानंतर तो क्लिअर होण्यासाठी तीन ते पाच दिवसांचा कालावधी लागतो. चेक दिल्यानंतर बिल भरल्याची पावती त्याच दिवशी मिळत असली तरी चेक रक्कम जमा झाल्याच्या तारखेलाच बिल भरणा ग्राह्य धरला जातो.



## डोणगाव येथे गुणवंताचा सत्कार

**उ. सोलापूर** : डोणगाव येथे रिपाई (आ)गटाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.गुणवंत शिक्षक, विद्यार्थी, आशा वर्कर यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप,वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा सरचिटणीस श्यामसुंदर गायकवाड,उत्तर तालुका अध्यक्ष- विठ्ठल वाघमारे, केंद्रप्रमुख कोळी, सरपंच राजश्री आमले, ग्रामपंचायत सदस्य- गौरीताई अवताडे, नानासाहेब कर्दळकर, दक्षिण तालुका अध्यक्ष- रामजी गायकवाड, उत्तर सोलापूर सरचिटणीस- नानासाहेब गायकवाड, संघटक सचिव- दत्ताभाऊ वाघमारे, उत्तर तालुका सदस्य- अभिमान शिंदे, राम साबळे, पंडित वाघमारे, नामदेव कसबे, युवराज वाघमारे, सचिन वाघमारे, रोहित वाघमारे, जखोबा हेगडे उपस्थित होते.




## संगम येथे रत्नाईच्या कृषीकन्यांनी लघुउद्योगाविषयी केले मार्गदर्शन

**माळीनगर** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत रत्नाई कृषी महाविद्यालय अकलूज येथील कृषीकन्यांनी माळशिरस तालुक्यातील संगम येथे महिला शेतकऱ्यांना बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात मागणी असणारे कमी जागेचे व कमी भांडवलात करता येणाऱ्या लघु उद्योगांविषयी माहिती देऊन प्रात्यक्षिक करून दाखवले.यामध्ये शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते पाटील प्राचार्य आर .जी .नलवडे ,कार्यक्रम समन्वयक प्रा .एस .एम एकतपुरे ,कार्यक्रम अधिकारी प्रा .एम .एम चंदनकर, प्रा .एच. व्ही कल्याणी यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्या साक्षी सोनवणे, प्रियंका काळदाते पाटील , गौरी कुबेर, प्रियांका कोकरे, साक्षी घाडगे, वनश्री सुतार , गीतांजली ढेकळे, पूजा सलगर, वर्षा गलंडे यांनी सांगितले की महिलांनी शेतीवर विसंबून न राहता शेतीशी निगडित असणारे अनेक लघुउद्योग करून स्वतःचा व त्याचबरोबर आपल्या देशाचा विकास साधला पाहिजे बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात मागणी असणारे व अतिशय कमी जागा व थोड्या भांडवलामध्ये करता येणारे केळींचे वेफर्स, पपईचा जाम व पनीर बनवणे यासारखे लघुउद्योग चालू करून स्वतःचा व आपल्या गावाचा विकास करून देशाच्या विकासामध्ये मोठे योगदान देता येते. यावेळी कृषीकन्यांनी केळींचे वेफर्स कसे बनवले जातात, पपई पासून जाम कसा बनवला जातो व दुधापासून पनीर कसे बनवले जाते याचे प्रात्यक्षिक करून महिलांना दाखवले व महिलांना लघुउद्योग करण्यासाठी प्रोत्साहित केले. या कार्यक्रमाला अनेक महिलांनी त्यांची उपस्थिती दर्शवली.



## माध्यमिक शिक्षकांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण

**अक्कलकोट** : सोलापूर जिल्हा आपत्ती कालीन व्यवस्थापन प्राधिकरण व अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभाग ,अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित माध्यमिक शिक्षकासाठी दोन दिवसीय प्रशिक्षण आयोजन केली होती,या प्रशिक्षणचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी हरिश्चंद्र गायकवाड, भीमाशंकर वाले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, याप्रसंगी तालुक्यातील४० प्रशिक्षणार्थी सहभाग नोंदवला आहे,याप्रसंगी तज्ञ मार्गदर्शक राहुल पारकर यांनी विविध आपत्कालीन व धोकादायक आपत्कालीन विषयी मार्गदर्शन केले यावेळी बीआरसी चे गणेश अंबुरे, गणेश लोणारे ,राठोड आदींनी याप्रसंगी सदर प्रशिक्षण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले यावेळी नागणसुर प्रशालेचे जेष्ठ शिक्षक शंकर व्हनमाने,सुरेश पिरगोंडे,थावरू चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.



## जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेच्या कबड्डी संघ ठरला उपविजेता

**अक्कलकोट**: जिल्हा क्रीडा अधिकारी व शिक्षण विभाग पंचायत समिती अक्कलकोट यांच्यावतीने फत्तेसिंह क्रीडांगणावर घेण्यात आलेल्या पावसाळी क्रीडा स्पर्धेत श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य उच्च माध्यमिक प्रशालेच्या १९ वर्ष वयोगट मुलींच्या कबड्डी संघाने पहिल्या दोन संघावर मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

तिसरा संघा बरोबर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात मुलींचा संघाने उपविजेता ठरला यात अस्मिता राठोड, भुवनेश्वरी बिराजदार,धनश्री पाटील,साक्षी माळी, रंजीता पुजारी ,प्रतिभा पुजारी, मयुरी ईश्वरकट्टी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली तसेच १९ वर्षे वयोगट लांबउडी स्पर्धेत कुमारी भुवनेश्वरी बिराजदार हिने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविले व जिल्हास्तरीय निवड झाली आहे. १९ वर्ष वयोगट १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत निखिल पवार यांनी तृतीय क्रमांक पटकावले.वरील सर्व विद्यार्थ्यांना ईश्वर माशाळकर ,वीरेश धानशेट्टी, .श्रीशैल सावळतोट लक्ष्मीपुत्र देशेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले.

# बी.आर.एस.हा सर्वधर्मसमभावनेचा आदर करणारा पक्ष : मुख्यमंत्री के.सी.आर

**सचिन सोनटक्के आणि नागेश वल्याळ यांचा भापजला पुन्हा दणका**

सुराज्य/सोलापूर

भारत राष्ट्रसमिती ही कोणताही धार्मिक भेदभाव पाळणारा पक्ष नसून तो सर्व धर्माचा आदर करणारा पक्ष आहे. तेलंगणात गेल्या १०वर्षात कोणताही धार्मिक अनुचित प्रकार घडला नाही यावरुन सलोख्याचे व शांततेचे वातावरण आहे. हे सिध्द होते. आज तुम्ही तेलंगणाचा विकास पहा मग प्रवेश करा. आमच्या पक्षात सर्वांना सन्मानाची वागणूक मिळते. प्रतिपादन सोलापूरातील भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्याक आघाडीचे पदाधिकारी राजीनामा देऊन बी.आर.एस.पार्टीत प्रवेश करणाऱ्या अल्पसंख्यांक पदाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री के.सी.आर यांनी दिले.

सोलापूर शहरात आणि दक्षिण विधानसभा मतदारसंघात बीआरएसची गाडी सुसाट वेगाने धावत आहे. पंढरपुरात भालके यांना जाहीर प्रवेश झाल्यानंतर बीआरच नेते तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांनी सोलापूर शहरतील तेलगु समाज आणि दक्षिण सोलापूरातील धनगर समाज आपले केले आहे. शनिवारी नागेश वल्याळ आणि सचिन सोनटक्के यांच्या नेतृत्वाखली दक्षिण सोलापूर आणि शहर भाजपाच्या २५ अल्पसंख्यांक पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा राजिनाम देऊ बीआर एस पक्षामध्ये प्रवेश करण्यासाठी रवाना झाले होते. रविवारी रात्री उशिरा त्यांचा मुख्यमंत्री के चेंद्रशेखर राव यांच्या उपस्थित प्रवेश झाला या प्रवेश कार्यक्रमात अल्पसंख्याक बांधवांनी यापुढे बी.आर.एस पक्षाच्या विस्तारासाठी संपूर्ण ताकद, व मताधिक्य मिळवण्यासाठी कटीबद्ध राहू असा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश प्रभारी अध्यक्ष वंमशीधरराव, शंकर धोंडगे, माणिक कदम, माजी नगरसेवक नागेश वल्याळ, दक्षिण सोलापूर समन्वयक सचिन सोनटक्के ,दशरथ गोप,मोहसीन शेख, झाकिरहुसेन डोका,बिल्कीस सय्यद,करीम सय्यद, हाजी अकील नलवार,अखलाक माशाळकर, रिजवान शेख,इक्बाल बागवान,रिजवान पिरजादे,सलमान कांपली,अझहर नदाफ,अझर पठाण,हाजी शहानवाज शेख, आदी उपस्थित होते.



### यांनी केला प्रवेश

चाँद सय्यद, सदाम नदाफा, असिफ सय्यद, समिर शेख, खलिमा शेख, असराफ पोटकुंडे, डोंणगावकर, फिरोज जमादार, हाजी. शहानवाज शेख, महिबुब सय्यद, जुबेर बागवान, रसिक कुरेसी, मोसिन शेख, जाहीर हुसेन डोका, बिलकुज सय्यद, करिम सय्यद, हाजी आखिल नलवार, सैफन हुंडेकरी, अकलाख माशाळकर, रिजवान शेख, इकबाल बागवान, रिझवान पिरजादे, सलमान कानपल्ली, अझर नदाफ, अझर पठाण

## पैसे देण्यास नकार दिल्याने कोयत्याने हल्ला ; दोघांवर गुन्हा

**सोलापूर** : पैसे देण्यास नकार देणाऱ्यावर कोयत्यानं खुनी हल्ला करून गंभीर जखमी करणाऱ्या दोघांना सदर बझार पोलीस ठाण्याच्या पथकानं सापळा रचून दोघांना शनिवारी सेटलमेंट परिसरातून अटक केली. त्यांना न्यायालयापुढे उभे केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.धीरज उर्फ आशुतोष अशोक जाधव (वय २४ वर्षे), अनिल नागेश गायकवाड (रा. सलगरवस्ती,डोणगाव रोड,सोलापूर) अशी दोघांची नावे आहेत.

# मतदार नोंदणी अभियानाकडे पाठ

## अभियानाला ३६ पैकी केवळ चार बीएलओ हजर

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट येथे दि २६ ऑगस्ट रोजी नगरपालिका हद्दीतील नवीन मतदार नोंदणी व नावात दुरुस्ती करता विशेष अभियान आयोजित करण्यात आले होते.या अभियाना विषयी बीएलओ यांना पूर्वसूचना देण्यात आली होती.प्रत्येक बीएलओ यांनी आपापल्या मतदान केंद्रावर सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हजर राहून नवीन मतदार नोंदणी करून घेणे अपेक्षित असताना ही या अभियानात ३६ बीएलओ पैकी केवळ चार बीएलओ हजर होते.

शहाजी हायस्कूलचे पाच पैकी फक्त दोन शिक्षक, तर वरिष्ठ हायस्कूल मधील पाच पैकी दोन शिक्षक असे फक्त चार बीएलओ या अभियानास हजर होते. एकंदरी तहसीलदार यांच्या आदेशाला बीएलओ आणि नगरपालिकेने केराची टोपली दाखवल्याचे बोलले जात आहे.

### कडक कारवाई करावी

मतदार नोंदणी अभियान यशस्वी राबविल्या शिवाय नवीन मतदारांना संधी मिळणार नाही.अक्कलकोट येथील मतदार नोंदणी अभियानात बीएलओ ची अनुपस्थिती ही गंभीर बाब आहे.या राष्ट्रीय कार्यात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर संबंधित तहसीलदार यांनी कडक कारवाई करावी.

**– महेश हिंडोळे,**
पक्ष नेता नगरपरिषद अक्कलकोट.

## क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन मारहाण

सुराज्य/सोलापूर

लहान मुलांच्या क्रिकेट खेळण्याच्या कारणावरून फिर्यादी निलेश सिध्दप्पा कट्टीमणी (वय-२६,रा. श्रीराम नगर,शाहीर वस्ती) यांच्या गल्लीत राहणारे गोरखनाथ जाधव,गुरुनाथ जाधव व गोरखनाथ यांची पत्नी यांनी फिर्यादी यांना त्यांच्या मामाचा मुलगा रुपेश केंभावी यांना शिवीगाळ करून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून दमदाटी केली.

तसेच गोरखनाथ जाधव यांनी हातात आणलेल्या चाकूने फिर्यादीच्या उजव्या डोळ्याच्या पापणीस मारून जखम केली असून,जखमेत पाच टाके पडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.ही घटना २६ ऑगस्ट रोजी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान श्रीराम नगर शाहीर वस्ती भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी निलेश कट्टीमनी यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून गोरखनाथ जाधव,गुरुनाथ जाधव व गोरखनाथ यांची पत्नी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे,पुढील तपास सहायक फौजदार ओहळ हे करीत आहेत.

## अपरिचित संस्थेतर्फे शालेय साहित्याचे वाटप

सुराज्य/सोलापूर




अपरिचित सामाजिक संस्थे तर्फे वर्षभर महापुरुषांची जयंती व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती व संस्थेच्या सदस्याच्या वाढदिवसाचा आनंद सदैव इतरांना सोबत वाटून आनंद व्दिगुणीत करून समाजोपयोगी कार्यक्रम घेऊन जयंती व वाढदिवस साजरा केला जातो.

महावितरण सोलापूर शहर ई उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता मा. श्री. प्रदिप मोरे साहेब व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मा. श्री. नागेश म्हात्रे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर महानगरपालिका शाळा क्रमांक २९, जय भवानी प्रशाला, भवानी पेठ, सोलापूर येथे मुलांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला. सदर प्रसंगी प्रदीप मोरे साहेबांनी अपरिचित सामाजिक संस्थेचे कार्य हे प्रेरणादायी असतातच पण समाजोपयोगी पण असतात.

यावेळी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन सोलापूर शहर विभाग सचिव बालाजी जाधव, अपरिचित सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मयुर गवते, आनंद फुलारी, शाळेचे मुख्याध्यापक गणेश धनवटे सर, अविनाश हिंगाने सर, मिलिंद राऊत, शाळेतील शिक्षक वृद्ध व विद्यार्थी उपस्थिती होते.

## गवळी वस्ती मानाचा गणपती २ मुली शिक्षणासाठी दत्तक घेणार

सुराज्य/सोलापूर

गवळी वस्ती तालीम संघ मानाचा गणपती मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा अरुण घुले यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी सकाळी मंडळाच्या सभागृहात पार पडली. यंदाच्या गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत पवार यांची निवड करण्यात आल. या निवडीनंतर यंदाच्या गणेशोत्सवात दोन गरजू मुलींच्या शिक्षणाचा वर्षभराचा संपूर्ण खर्च उचलून त्यांना दत्तक घेणार असल्याची घोषणा केली

या बैठकीला मंडळाचे संस्थापक महादेव गवळी, औदुंबर जगताप, वामन वाघचवरे, बाळासाहेब घुले, उमाकांत निकम, हेमंत पिंगळे ,अरुण घुले, मावळते अध्यक्ष लहू गायकवाड, जगन्नाथ भोसले ,शंकर घुले, श्याम गांगर्डे, विजय घुले ,विष्णू जगताप, बबलू जगताप, सचिन कदम, बिट्टू शिंदे ,शेखर कवठेकर, लखन कारंडे, गोरख बेंद्रे, ब्रह्मदे खटके,बजरंग घुले, सुनील कदम यांच्यासह मंडळाचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते

**नूतन पदाधिकारी असे**

अध्यक्ष (चंद्रकांत पवार), उपाध्यक्ष (अरुण सरगर, अक्षय जगताप) सेक्रेटरी (बसवराज नवले, लक्ष्मण पवार) खजिनदार (बम्हदेव खटके, संदीप काशिद) मिरवणूक प्रमुख (औदुबर जगताप, वामन वाघचवरे)

## गणेश उत्सववातील मंडप व इतर करशुल्क रद्द करा

**सोलापूर** : पुणे मुंबई प्रमाणे सोलापूरात ही गणेश उत्सववातील मंडप व इतर कर (शुल्क) माफ करावे अशी मागणी मध्यवर्ती गणेश उत्सवाची मंडळाने केली आहे.रविवार २७ ऑगस्ट रोजी सार्वजनिक मध्यवर्ती गणेश उत्सव मंडळाची ट्रस्टी ची बैठक ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

सोलापुरातल्या मानाच्या आजोबा गणपती प्रेरणा घेऊन राज्यात गणेश उत्सवाची सुरवात झाकी आहे. त्यामुळे शासनाने मुंबई ,पुण्याच्या धर्तीवर सोलापूर जिल्ह्यातही उत्सव मंडळावर सोलापूर महानगरपालिकेचे मंडप व इतर कोणतेही कर व शुल्क आकारण्यात येऊ नये. त्याचबरोबर उत्सव काळात सलग पाच दिवस मंडळांना रोशनाई साठी रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेप वापरण्यास सुट मिळावी अशी ठराव करत लवकरच सार्वजनिक मध्यवर्ती मंडळाची शिष्टमंडळ मुख्यमंत्री, पालकमंत्र्यांचा भेट घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस नरसिंग मेगजी ,अंबादास गुत्तीकोंडा दास शेळके, संजय शिंदे, घनश्याम भैय्या, गौरव जक्कापुरे, कैलास मेंगाने,सोमनाथ मेंडके, विजय पुकाळे, नंदकुमार उपाध्ये उपस्थित होते.




## अक्कलकोट तालुक्यातील गुणीजनांचा गौरव

सुराज्य/अक्कलकोट

लोक शाहिर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त लहुजी शक्ती सेना सोलापुर जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या वतीने अक्कलकोट तालुक्यातील गुणीजनांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.पुरस्कार सोहळा सभारंभाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे तालुकाध्यक्षा शितल म्हेत्रे ह्या होत्या.

लहुजी शक्ती सेना प्रदेश अध्यक्ष कैलास खंदारे,पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले,राज्य कार्यकारणी सदस्य रोहित भाऊ खलसे,अनिल बनसोडे, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे,समाजसेवक निवृत्ती पारखे, सुनीता हडलगींी, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे, तालुकाध्यक्ष हरि देडे, वंचित बहुजन आघाडी शहराध्यक्ष विशाल ठोबरे आदि मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. ज्यांना पुरस्कार वितरण केले असे ते, गुणीजन गौरवाचे मानकरी आदर्श प्रशासकीय अधिकारी

बाळासाहेब सिरसट तहसीलदार अक्कलकोट, श्री राजशेखर लिंबारे अप्पर तहसीलदार मंद्रूप, महेश भावीकट्टी, ठाि नॉर्थ पोलीस स्टेशन अक्कलकोट कुदसीया युसुफ शेख ,गटशिक्षणाधिकारी अक्कलकोट ,बसवराज चडचण उपप्राचार्य खेडगी कॉलेज ,डॉक्टर अशोक राठोड अधीक्षक ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट, सुदेश कांबळे मुख्याध्यापक शहाजी हायस्कूल, श्री नंदाजी कदम मुख्याध्यापक मंगरूळे हायस्कुल,संदीप सोमवंशी पोलीस हवालदार, प्रा.धानय्या कवटगीमट, चेतन जाधव,

श्रीमती रिंकू जाधवर ,मुस्तफा मनियार, सतीश देशमुख, करकंब, इरफान टीनवाला सहशिक्षक, आप्पासाहेब देशमुख, आदर्श समाजिक कार्य रशीद खिरस्तके समाजसेवक, म्हाळप्पा पुजारी आदर्श सरपंच गुरववाडी ,वरूण शेळके उत्कृष्ट अभियंता , वैशाली कासेगावकर पंचायत समिती अक्कलकोट

आदी मान्यवरांना गुणीजन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पुरस्कार सोहळा यशस्वितेसाठी कृष्णा देडे, समर्थ देडे, सद्दाम शेख आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन प्रकाश सुखसे यांनी केले तर इस्माइल जमादार, राजु स्वामी, हसापूर यांनी देखील या कार्यक्रमाची शोभा वाढवण्याकरिता अथक परिश्रम घेतले .

# निमगावचा वावडी व हिरकणी महोत्सव उत्साहात

सुराज्य/नातेपुते



निमगाव वावडी महोत्सव संयोजन समितीने आयोजित केलेला निमगाव वावडी आणि महिलांसाठी आयोजित केलेला हिरकणी महोत्सव प्रसिद्ध सिने अभिनेते मिलिंद गुणाजी यांच्या उपस्थितीत रविवारी निमगाव येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला.

यावेळी सोलापूर जिल्ह्यासह पुणे ,सातारा सांगली आदि जिल्ह्यातील वावडी प्रेमींनी आपला सहभाग नोंदविला. या वावडी महोत्सव व हिरकणी महोत्सवचा बक्षीस वितरण समारंभ सिने अभिनेते मिलिंद गुणाजी यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमासाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, हिंदुराव माने पाटील काँग्रेस नेते ड एम एम मगर, डॉ. राजीव राणे ,डॉ तानाजीराव कदम ,डॉ श्रीकांत देवडीकर, डॉ श्रद्धा जवंजाळ, डॉ मानसी देवडीकर ,डॉ राहुल जवंजाळ, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब देशमुख ,ॲड. सोमनाथ वाघमोडे, ॲड. जी पी कदम ,माजी उपसभापती किशोर सूळ, स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर, बाळासाहेब सरगर ,संजय देशमुख, उत्तमराव माने शेंडगे ,अण्णासाहेब इनामदार, अण्णासाहेब शिंदे, राजन जबडे, सा बां विभागाच्या कार्यकारी अभियंता सुनीता पाटील ,निमगाव चे सरपंच सुभाष साठे ,उपसरपंच नंदकुमार पाटील , हनुमंत पवार ,बबनराव जाधव ,महादेव मगर, संचालक हरिभाऊ मगर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

तीन गटात झालेल्या या स्पर्धेच्या मोठ्या गटातील शिवतांडव ग्रुपने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले तर द्वितीय क्रमांक होय हिंदूच तृतीय मराठा साम्राज्य व होलार गल्ली उत्तेजनार्थ हमारा कल बेटी और जल व क्रांतीसुर्य माळी ग्रुप विजेते ठरले मध्यम गटात प्रथम क्रमांक शिवप्रेमी चांद्रयान तीन द्वितीय विराज मगर तृतीय प्रसाद राऊत तर उत्तेजनार्थ नेहरूनगर बॉईज ग्रुपला देण्यात आले तर लहान गटात प्रथम मावळा ग्रुप द्वितीय संस्कार गाडेकर तृतीय विशाल तोरणे तर उत्तेजनार्थ ओम गाडेकर व पृथ्वीराज खंडागळे यांना विभागून देण्यात आले यावेळी काँग्रेस नेते ड एम एम मगर व जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील मिलिंद गुणाजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले

### ४०० महिलांनी सहभाग नोंदविला

निमगाव वावडी महोत्सव संयोजन समितीच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या हिरकणी महोत्सवात जवळपास ४०० महिलांनी सहभाग नोंदविला या स्पर्धेत माधुरी मगर, साधना कदम व सपना मगर यांना अनुक्रमे पैठणी मिक्सर व कुकर अशी बक्षिसे सिने अभिनेते मिलिंद गुणाजी यांच्या हस्ते देण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वच महिलांना संयोजन समितीच्या वतीने आकर्षक भेटवस्तू देण्यात आली

# मृतदेह पोलीस ठाण्यासमोर ठेवून विटंबना; २९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्ह्यातील आरोपींवर कलम ३०७ व कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करा म्हणून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी न नेता पोलिस ठाण्याच्या दारात ठेऊन प्रेताची विटंबना केली. मानवी शवाची अप्रतिष्ठा केली तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी २९ जणांसह इतर ४० ते ५० जणांवर भादवि कलम २९७,१४३ व महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पो.कॉ.हरिश्चंद्र पाटील यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, मागील भांडणाची कोर्टात सुरु असलेली केस मागे घेण्याच्या कारणावरून दोन गटामध्ये दि.२३ रोजी सायं ६ वा सुमारास मुंगशी लोणी रोडवर लोणी नाका येथे झालेल्या हाणामारीबाबत दोन्ही गटाकडून परस्परविरोधी गुन्हा दाखल झाला होता. यामध्ये एका गटातील नानासाहेब कोकरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी कोकरे यांच्या फिर्यादीवरुन सदर गुन्हा दाखल केला होता मात्र पोलिसांनी समोरील आरोपींवर कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल केला नसल्यामुळे मृताचे भाऊ बाळासाहेब कोकरे व इतर लोकांनी पोलिस ठाण्यासमोर मयत नानासाहेब कोकरे यांचा मृतदेह आणून आरोपींवर कलम ३०७ व ३०२ अन्वये गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करत आंदोलन केले होते.

यानंतर सोलापुर स्था. गु.अ.विभागाचे पो.नि.सुरेश निंबाळकर यांनी दाखल गुन्ह्याच्या तपासाबाबत माहिती देऊन मयताची विटंबना होऊ नये म्हणून धार्मिक रीतीरिवाजाप्रमाणे अत्यंविधी करण्याबाबत व प्रेताची विटंबना होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे पो.का.कलम ३७ (१)(३) लागू असल्याच्या सूचना संबंधितांना दिल्या असताना देखील यातील जमावाने कलम ३०७ ,३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करा म्हणून बेकायदेशीर जमाव जमवून रुग्णवाहीकेतून मृतदेह काढून पोलिस ठाण्यासमोर रस्त्यावर ठेऊन प्रताची विटंबना करुन, मानवी शवाची अप्रतिष्ठा केली. जिल्हाधिकाऱ्यांचा आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी २९ जणांसह इतर ४० ते ५० लोकांवर गुन्हा दाखल झाला आहे.




### यांच्यावर झाला गुन्हा दाखल

बाळासाहेब कोकरे, अमरजीत पाटील, जितू चव्हाण– पाटील, अमोल चव्हाण–पाटील, प्रकाश बरडे सर्व रा. बिटरगाव ता.माढा, अभिजीत सोलंनकर, धनाजी कोकरे, सागर तरंगे, सोमनाथ देवकते, मच्छिंद्र लेंगरे, आप्पा बोरकर सर्व रा. कुर्डुवाडी, दिलीप गडदे रा. शिंगेवाडी, शिवाजी पाटील, लक्ष्मण पाटील, किरण बोरकर, राजू बोरकर, अरुण बोरकर, संतोष बोरकर, नाना बोरकर सर्व रा. म्हैसगाव, महावीर गावले, सुरेश गावले दोघे रा मुंगशी, प्रकाश तांबे रा नाडी, अभिमान शिंदे रा.ढवळस, नागेश लोंढे , धनाजी लोंढे दोघे रा.लोणी, अण्णासाहेब रुपनवर, नाथा रुपनवर रा डोंबाळवाडी ता.माळशिरस, रामचंद्र टकले रा चांदज, विलास कादबाने रा .परंडा यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



## तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेत जिजाऊ ज्ञानमंदिर उपविजेता

✔ **उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील कोंडी येथील जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश मिडीयम स्कुल, विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कबड्डी स्पर्धेमध्ये उपविजेतेपद पटकावले आहे. युवक संचालनालय पुणे विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या उत्तर सोलापूर तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल मधील १४ वर्षे गट- बलदवा देगाव प्रशाला विरुद्ध जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यामध्ये झाला.साखळी सामन्यात हिंदुस्तान कॉन्व्हेंट स्कूल विरुद्ध जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल यामध्ये झाला. जिजाऊ च्या खेळाडूंनी दुसरा सामना एकतर्फी जिंकला. बारा गुण घेत जिजाऊ चा संघ उपांत्यपूर्व फेरीमध्ये येवुन पोचला. उपांत्य पूर्व फेरीचा सामना जिजाऊ च्या संघाने तीन गुणांनी जिंकून तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. जाधव प्रवीण, मुलाणी सरफराज,खंदारे पार्थ,नीळ शिवतेज,गुंड यश,राठोड सुमित,जाधव अमित,राठोड राहुल, घडमोडे सार्थक,निराळे धीरज,राठोड श्रीनिवास,सुतार संस्कार या खेळाडूंनी यशस्वी कामगिरी केली.विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय-१९ वर्ष गटात एम आय टी जूनियर कॉलेज केगाव यांच्यावर दहा गुणांनी विजय मिळवुन उपविजेतेपद पटकाविले. विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय मधील खेळाडू कांबळे युवराज,शिंदे केदार,तरटे क्रिश,व्यवहारे वैभव,पवार देवा, वानी समर्थ,कांबळे पृथ्वीराज,धावणे सुनील,काकडे संभाजी, नागणे विशाल,पंडित सूरज,सुरवासे प्रणव आदी खेळाडूंनी विजयाची परंपरा कायम राखली असून संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ, प्राचार्य सुषमा नीळ , मुख्याध्यापिका तेजश्री कुलकर्णी ,अर्चना ओरादे, वैभव मसलकर, क्रीडा शिक्षक दीपक भोसले यांचे मार्गदर्शन मिळाले.

## ओंकार कारखाना परिवाराने बांधिलकी जोपासली : पुलकुंडवार

✔ **पिलीव** : ओंकार साखर कारखाना परिवाराने बंद असणारे साखर कारखाने करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांनचा प्रश्न सोडविला तसेच त्या परीसरातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन त्या परिसराचा कायापालट केला असल्याचे मत साखर आयुक्त चंद्रकांत पुलकंडवार यांनी व्यक्त केले.ते ओंकार साखर कारखान्याच्या अदयावत कार्यालयाचे उदघाटन करणयात आले त्यावेळी ते बोलत होते. तर यावेळी चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी सध्या ओंकार साखर कारखान्याच्या चारही युनीटची अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत.चांदापुरी येथील युनीट एकमधील विस्तारीकरणाचे कामही सध्या प्रगतीपथावर आहे.यंदाच्या २०२३-२४ च्या गळीत हंगामात हा कारखाना अदयावत करुन पुर्ण क्षमतेने चालवणार असल्याचे त्यांनी सांगितले. ओंकार साखर कारखान्याने सामाजिक बांधीलकी म्हणून पाच हजार वृक्षाचे वृक्षारोपण करुन त्याची संगोपणाची जबाबदारी घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. सदर कार्यक्रमास पंढरपूर येथील विठठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, दादासाहेब बोत्रे पाटील, संचालीका रेखाताई बोत्रे पाटील, प्रशांत बोत्रे पाटील, ओम बोत्रे पाटील, डॉ गौरी बोत्रे पाटील, जनरल मॅनेजर ,उद्योगपती,ऊस उत्पादक शेतकरी व पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## प्रा. पांडुरंग भोसले यांना पीएच.डी प्रदान

✔ **वेळापूर** : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज, संचलित अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा पांडुरंग भोसले यांना सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जमातींचा सामाजिक व आर्थिक अभ्यास या विषयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सेलापूर विद्यापीठ, सोलापूरकडून पी एच.डी पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. पांडुरंग भोसले यांना शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे हे मार्गदर्शक म्हणून लाभले. शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालीका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे, सह सचिव हर्षवर्धन खराडे तसेच महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अमरसिंह माने-देशमुख व इतर मान्यवरांनी डॉ. पांडुरंग भोसले यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या यशा बद्दल अर्धनारी नटेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज नांगरे आणि मुख्यध्यापक उदय उरणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. रविंद्र माने, प्रा. दादा साठे, डॉ. बिटू मोलाणे-भोसले, प्रा. आशा गायकवाड, ग्रंथपाल डॉ.वैशाली मोरे, प्रा. गोरख मंगवडे, प्रा. अभिजीत घाडगे, प्रा. नानासाहेब वरकड, प्रा. उर्मिला कोडग, प्रा. संजय पाटील, प्रा. राहुल चव्हाण, राजेंद्र बामने, रविंद्र साळुंखे इ. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर Classified

विवाह विषयक

वधू-२६, ५.३, गोरी, १० वी, मराठा आई नाही वडिल हातगाडी चालवितात. मुलीचा गृह उद्योग आहे. गरीब घरातील मुलीकरीता सर्व जातीय कष्टाळू वर चालेल. त्वरीत लग्न.
मो. नं. ७५१७०४९१७३, ७५१७०५७८४२ (290823)




## कुर्डूवाडी जनता बँकेची सर्वसाधारण सभा

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

जनता सहकारी बँक लिमिटेड कुर्डुवाडी या संस्थेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. शनिवारी पंचायत समितीच्या कै. विठ्ठलराव शिंदे सभागृहात झालेल्या या सभेत सभासदांना ११ टक्के लाभांश बँकेचे अध्यक्ष दिलीप तळेकर यांनी जाहीर केला. ते या सभेच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी सहा.व्यवस्थापक विजय गायकवाड यांनी अहवाल वाचन केले.

या सभेत सभासदांनी सर्व विषयांना एक मताने मंजुरी दिली. यावेळी उपाध्यक्ष किरण दोशी,संचालक माजी अध्यक्ष फुलचंद धोका ,अर्जुनराव बागल,अशोक खाडे,अनिलकुमार तरटे, विक्रम बोराडे, सुलभा दिंडे-दास,डॉ. मोनिका शहा, विजयसिंह परबत, अनिलकुमार पाटील, चंद्रशेखर क्षीरसागर, आदी संचालक उपस्थित होते.

स्थापनेपासून कायम 'अ' वर्ग मिळवणाऱ्या या संस्थेचे चालू वर्षातील भागभांडवल २ कोटी ३३ लाख ३४ हजार २०० एवढे आहे. बचत ठेवी १० कोटी ८ लाख १४ हजार ७७५ ,चालू ठेवी ७८ लाख ७९ हजार ५७७ ,मुदत ठेवी ४९ कोटी २७ लाख ८७ हजार ४८६ इतके आहे.असे एकूण ६० कोटी १४ लाख ८१ हजार ८३९ च्या ठेवी आहेत. एकूण कर्जे २९ कोटी ५४ लाख ३० हजार ६२१ एवढे असून ३१ मार्च २०२३ अखेर बँकेला ६३ लाख ६ हजार १७१ एवढा नफा झाला असून बँकेचे खेळते भांडवल ७२ कोटी ५८ लाख ८२ हजार ४२५ एवढे आहे .अशी माहिती यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिलीप तळेकर यांनी दिली.

रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या निकषाच्या मर्यादेत राहून बँक नेट एन पी ए चे प्रमाण ०.०० टक्के राखण्यास यशस्वी झाली आहे. यावेळी साहित्यिक राजेंद्र दास, संभाजी सातव,जगन्नाथ क्षीरसागर,प्रकाश गोरे,वसंत बागल, नागनाथ हलकुडे, दत्ताजी गवळी,दयानंद पवार,विशाल गोरे,नागनाथ माळी, अजित पुर्वत,ब्रिजपाल वाल्मिकी, विनायक राऊत, जयंत पुर्वत,सुधीर मराळ,युसुफभाई दाळवाले, समीर तरटे आदी सभासद यावेळी उपस्थित होते.

सभा यशस्वी करण्याकरिता सी इ ओ चंद्रकांत वाणी, शाखाधिकारी सुनीता साळुंके ,सत्यवान जगदाळे,सुहास मराळ,धनंजय चव्हाण,दत्तात्रय शिंदे,अमोल दिंडोरे,वसंत नवगिरे,सुशेन खडके,कुलभूषण शहा,विकास गुरवे,संदीप आवटे,राहूल डिकोळे, दिनेश माने, धीरज चव्हाण ,रोहिणी रणदिवे,दीपिका वायकर, सीमा पाटील,पांडुरंग लोंढे, प्रसाद कन्हेरे,सागर जाधव,अमोल माळी,विशाल लामतुरे,दीपक सूर्यवंशी,बळीराम डोके यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार किरण दोशी यांनी मानले.

## पिलीव येथे कुस्ती स्पर्धा

✔ सुराज्य/पिलीव



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे तालुकास्तरीय कुस्ती, फ्री स्टाईल व ग्रीको स्पर्धा अतिशय उत्साहात संपन्न झाल्या.

या स्पर्धेचे उद्घाटन तालुका क्रिडा अधिकारी गाढवे, पिलीव जि प गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, मुख्याध्यापक कापसे, यांच्या हस्ते व माजी सरपंच संग्राम पाटील, अमोल मदने, माजी उपसरपंच आरिफखान पठाण, नारायण सुळे, प्रकाश कारंडे यांच्या उपस्थित करणयात आले. या तालुकास्तरीय कुस्ती व फ्री स्टाईल व ग्रीको स्पर्धेत तालुक्यातील सर्व शाळामधील १४,१७ व १९ वर्ष वयोगटातील मुला व मुलींनी सहभाग नोंदविला .सदरच्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेचा संयोजनाचा मान प्रथमच कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयास मिळाला यामध्ये विदयालयाने या स्पर्धेचे सांस्कृतिक भवन याठिकाणी २४,२५ व २६ ऑगस्ट या तिन्ही दिवसी नेटके नियोजन केले .

पिलीव येथील वाजीद शेख व बंधु ,वस्ताद मोहन मदने,वैभव सुळे व इतर वस्ताद यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडणयासाठी मोलाचे विशेष सहकार्य केले.

## बसवराज प्रशालेचे यश

✔ **अक्कलकोट** : तालुका स्तरीय पावसाळी स्पर्धा २०२३-२४ आयोजित केलेले कबड्डी स्पर्धेत श्री बसवराज प्रशाला करजगी (वयोगट १७ व १४) तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावले. श्री.बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. दयानंद उंबरजे यांनी प्रशालेत विजेते खेळाडूंचे पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले.

यावेळी प्राचार्य शिवानंद बिराजदार, पर्यवेक्षक चंद्रशेखर चडचण,क्रिडा शिक्षक नागय्या स्वामी, संतोष उंबरजे , गुरूशांत हौशेट्टी, सखाराम शिंदे उपस्थित होते.



## बेंबळे जि.प. शाळेत वृक्षारोपण

✔ **टेंभुर्णी** : माढा तालुक्यातील बेंबळे येथे. जिल्हा परिषद शाळा बेंबळे येथे वृक्षारोपण करण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोविंद भोसले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच विजय पवार उपस्थित होते . यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेत ५० फुलझाडांचे वृक्षारोपण केले .वृक्षारोपण साठी कट्टे बांधून , माती टाकून जय्यत तयारी करण्यात आली होती यावेळी केंद्रप्रमुख नागेश भोसले व मुख्याध्यापक श्री .समाधान अवताडे यांनी कार्यक्रमाचे स्वरूप आणि महत्व सांगून शाळेच्या विकासासाठी सर्वांना मदतीचे आवाहन केले. शाळेसाठी भरघोस देणगी देणाऱ्या कंदर येथील सुप्रसिद्ध केळी व्यापारी किरण डोके व बेंबळे गावातील विश्वजित भोसले यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, तसेच इतर देणगीदारांचाही गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा आश्विनी कोळी, उपाध्यक्ष तुकाराम वाघमोडे ,उपसरपंच गोरख अनपट माजी उपसरपंच सोमनाथ हुलगे, बंकट काळे, बबलू काळे, अभिजित पवार, कांतिलाल काळे व शिक्षक श्री . बाळू जाधव, उमेश ओहोळ, शुभांगी देशमुख, गुणशिला राजोळे, वर्षा भांगे, अंजू नाईकनवरे . शंभूराजे जगताप. दत्तात्रय सुरवसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवताडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री .जोडवे यांनी केले .

## आचेगांव येथे बुद्धविहार सभामंडपचे भूमिपूजन

✔ सुराज्य/अक्कलकोट



आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मंजूर केलेल्या बुद्धविहार समोरील सभामंडप कामाचे भूमिपूजन विद्यमान सरपंच सौ. विश्रांती पाटील यांच्या हस्ते व भाजप अनु जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांच्या उपस्थित करण्यात आले. यावेळी विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन जयशंकर पाटील, निवृत्त लोहमार्ग ए. एस. आय जगन्नाथ गोतसुर्वे, रिपाई नेते विकास सुर्वे,माजी सरपंच महादेव पाटील,ग्रापं सदस्या श्रीम. मंगल गोतसुर्वे, ग्रापं सदस्या सौ. गौतमी बलवान गोतसुर्वे,माजी सैनिक राजेश गोतसुर्वे, मल्लू शिलेणी आदी उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन जयशंकर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक माजी सरपंच बलवान गोतसुर्वे यांनी केले. यावेळी सुभाष गोतसुर्वे, अशोक पाटील शिलेप्पा घुंगरगांवकर,जालिंदर गोतसुर्वे, अप्पराव वाघमोडे, राहुल नवगिरे,कपिल गोतसुर्वे,विशाल गोतसुर्वे,शरद गोतसुर्वे,प्रदीप गोतसुर्वे, हुसेनी बनसोडे,भारत सोनकांबळे, चेतन कांबळे,भारत गोतसुर्वे,आदीसह गावकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## वेळापूर इंग्लिश स्कूलच्या सिद्धार्थची विभागीय स्पर्धेसाठी निवड

✔ **वेळापूर** : सोलापूर येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय १७ वर्षे वयोगट कॅरम स्पर्धमध्ये वेळापूर तालुका माळशिरस येथील इंग्लिश स्कूल वेळापूरचा विद्यार्थी सिद्धार्थ अनिल माने देशमुख याने यश मिळवून त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्याला क्रीडा शिक्षक भास्कर बागल यांचे मार्गदर्शन लाभले. यश मिळवलेल्या विद्यार्थ्याचे व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकाचे इंग्लिश स्कूल संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, सचिवा प्रियदर्शनी महाडिक कदम, संस्थेचे आधारस्तंभ डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ.सौ. मीनाताई कदम, संचालिका तेजस्विनी कदम महाडिक, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, प्रशालेचे प्राचार्य आर बी पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक पठाण शिवशरण, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष संजय देशपांडे, महिला उपाध्यक्षा सौ स्मिता पिसे, कोषाध्यक्ष दत्तात्रय काटे, सचिव सतीश कदम, सहसचिव सत्यवान पिसे व पालक संघाचे सर्व सदस्य आणि शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

### विठ्ठल गंगा फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या निर्यातीचा शुभारंभ

## चांगल्या गुणवत्तेचा केळीमाल उत्पादित करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन : शिंदे

✔ सुराज्य/माढा

विठ्ठल गंगा फार्मर कंपनी निमगाव टे येथे केळी निर्यातीचा शुभारंभ नुकताच संपन्न झाला.

यावेळी कंपनीने या हंगामातील पहिले पाच कंटेनर निर्यातीसाठी पाठवले .हा कार्यक्रम कंपनीचे चेअरमन धनराज दादा शिंदे यांच्या मातोश्री सौ शारदाताई रमेशराव शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी परिसरातील महिला सभासद मालपुरवठादार वाहन मालक कंपनीचे संचालक व कर्मचारी व उपस्थित होते .

यावेळी शेतकरी दांपत्याच्या हस्ते पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना कंपनीचे चेअरमन धनराज दादा शिंदे यांनी यापुढे सभासद व शेतकरी




केळी योग्य दरात काढली जाईल व वेळेत केळीचे सर्व बिल दिले जाईल व त्यामध्ये नियमित्ता राहील असे बोलताना सांगितले .त्याचबरोबर केळी लागवडीसाठी लागणारे रोपे त्यानंतर मार्गदर्शन औषधे व काढणी या सर्व गोष्टी कंपनी करणार आहे.

यावेळी बोलताना त्यांनी शेतकऱ्यांना चांगल्या गुणवत्तेचा माल उत्पादित करण्यासाठी आवाहन केले. त्याचबरोबर त्यांनी मोठ्या प्रमाणात केळीची लागवड करावी व असलेल्या केळीची नोंद कंपनीकडे द्यावी असेही आवाहन यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना केले.

# शिवसेना महाआरोग्य शिबीरास जनतेचा उदंड प्रतिसाद

## २० हजार नागरिकांची झाली आरोग्य तपासणी

सुराज्य/सोलापूर



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे आरोग्यदूत आरोग्यमंत्री प्रा.तानाजीराव सावंत यांनी राज्यातील जनतेच्या आरोग्याकरिता वेगवेगळ्या शिबिरातून शासनाच्या व शिवसेना पक्षाच्या माध्यमातून सातत्याने जनतेचे आरोग्य जपण्यासाठी उपाययोजना राबवित आहेत. शिवसेना सोलापूर संपर्क प्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वात शिवसेने तर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन शिवसेना शहरप्रमुख मनोज शेजवाळ यांनी वाय चौक, सोनी अपार्टमेंट शेजारील मैदान येथे झालेल्या शिबिरात २० हजार नागिरकांनी सहभाग नोंदवला.

या शिबीराचे उदघाटन शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा शिवाजीराव सावंत, प्रदेश प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले, जिल्हाप्रमुख महावीर देशमुख, शहर समन्वयक दिलीप कोल्हे, युवासेना जिल्हाप्रमुख उमेश गायकवाड, सागर शितोळे, प्रियदर्शन साठे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील, महानगरपालिका आरोग्यअधिकारी डॉ.बसवराज लोहारे, डॉ.मोहन शेंगर, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ.अतिश बोराडे, डॉ.गणेश इंदूरकर यांच्या उपस्थित करण्यात आले. शिबीरात कान नाक, घसा, त्वचा रोग, हृदयाची तपासणी, ईसीजी, ब्लड प्रेशर तपासणी ,नेत्र तपासणी ,मेन्दुच्या विविध तपासण्या करण्यात आल्या, या शिबरचा लाभ दमाणीनगर, गवळी वस्ती, पावन गणपती परिसर, गडदर्शन,हब्बू वस्ती, आमराई, आवसे वस्ती, प्रतीक्षा बंगलोज, निराळे वस्ती,अवंती नगर, देगाव, बसवेश्वर तांडा, गंगानागर, थोबडे वस्ती शहरातील मध्यमवर्गीय लोकवस्ती असलेल्या भागातील लोकांनी घेतला.शिबीर यशस्वी करण्यासाठी नगरसेवक मनोज शेजवाळ मित्र परिवार तसेच प्रभाग क्रमांक ६ मधील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी महिला शहरप्रमुख जयश्रीताई पवार, दत्तात्रय सावंत, राजकुमार शिंदे, समर्थ मोटे, शशी शिंदे, शिवाजी नीळ, ब्रह्मदेव गायकवाड, सायबांना तंगेळी, शशिकांत कट्टीमनी, किशोर चव्हाण, शिवराज विभूते, ज्योतिबा गुंड, पद्मसिंह शिंदे, येशू मड्डी, लकी कोंका, कॉलेज कक्ष जिल्हाप्रमुख सुजीत खुर्द, जवाहर जाजू, मानिशाताई नलावडे, सुनंदाताई साळुंके, अनिता गवळी, अश्विनी भोसले, संगीता कणबसकर, निहाल शिवसिंगवले उपस्थित होते.

## थोडक्यात...



### भारताच्या चांद्र विजयावर मूकबधिर विद्यार्थ्यांचे गोड स्नेहरक्षाबंधन

**सोलापूर** : भारतीय शास्त्रज्ञांनी शर्थीचे प्रयत्न करून मिळविलेल्या चांद्र विजयाबद्दल रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राख्या रक्षाबंधनानिमित्त सन्मानपूर्वक पाठविण्यात आल्या.

इसरो शास्त्रज्ञांनी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आपला तिरंगा फडकवणारा जगातील एकमेव देश होण्याचा मान मिळवला.या ऐतिहासिक क्षणाचा आनंद सर्व मूकबधिर विद्यार्थ्यांनी घेतला. प्रतिवर्षी सीमेवरील सैनिकांसाठी राख्या पाठविल्या जातात.या वर्षी या भारतीय शास्त्रज्ञसैनिकांची छाप भर पडली.हा विजयी क्षण विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय असल्याचे प्रतिपादन शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केले.या राख्या बनवण्यासाठी कलाशिक्षक चिदानंद बेनुरे, मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे, तसेच विद्यार्थी ,कर्मचारिवृंद यांचे सहकार्य लाभले.शाळेचे सचिव सुनील दावडा यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम घेण्यात आला.



### ताता गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना

**सोलापूर** : पूर्वभाग मध्यवर्ती गणेशोउत्सव मंडळातील मानाचा ताता गणपती सांस्कृतिक मंडळाच्या मूर्तीची पुंनरप्रतिष्ठापना सोमवारी सकाळी करण्यात आले.३८ वर्षांपूर्वी केलेल्या मूर्तीची पुनर्निमिती करण्यात आले. कैलासवासी आशय्या आरकाल यांच्या स्मरणार्थं मुरलीधर आरकाल यांनी ही नवीन मूर्ती बनवून दिली आहे.मूर्तिकार राजू गुंडला यांनी ही मूर्ती तयार केली आहे.पूर्व भाग सार्वजनिक गणेशोउत्सव मंडळाचा प्रमुख मानाचा गणपती असून तेलगुत ताता म्हणजे आजोबा तेलगू भाषिकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मूर्तीची प्रतिष्ठापना सोमवारी सकाळी श्री शबर श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी नागणसुर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मुरलीधर आरकाल,सत्यनारायण बोल्ली,उमेश मामड्याल,राजेंद्र द्यावरकोंडा,श्रीनिवास मड्डुर,संदीप कन्ना,सत्यनारायण आरकाल,संदीप संगा,दीपक कुरापाटी आदी उपस्थित होते.ध्वजारोहण,गणेश याग,नवग्रह पूजा,होम हवन त्यानंतर मूर्तीस प्राण प्रतिष्ठा करण्यात आले. पहाटे पाच वाजता विधीना प्रारंभ झाला साडे अकरा प्राणप्रतिस्थपणा करण्यात आले. सौ. जयश्री व बालाजी आरकाल हे पूजेचे यजमान होते.



### कबड्डी स्पर्धेत श्री बसवराज प्रशालेचे यश

**अक्कलकोट** : तालुका स्तरीय पावसाळी स्पर्धा २०२३-२४ आयोजित केलेले कबड्डी स्पर्धेत श्री बसवराज प्रशाला करजगी (वयोगट १७ व १४ ) तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावले. श्री.बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ड दयानंद उंबरजे यांनी प्रशालेत विजेते खेळाडूंचे पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस गोड शुभेच्छा देऊन सर्व क्रिडा शिक्षकांचे आभार मानले. यावेळी प्राचार्य शिवानंद बिराजदार, पर्यवेक्षक चंद्रशेखर चडचण,क्रिडा शिक्षक नागय्या स्वामी, संतोष उंबरजे, गुरूशांत हौशेट्टी, सखाराम शिंदे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### सर्पदंश झाल्याने १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**सोलापूर** :कोळेगाव (ता.मोहोळ) येथे सर्पदंश झाल्याने बारा वर्षीय मुलगा उपचारा दरम्यान मयत झाला. ही घटना कोळेगाव (ता.मोहोळ) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. राज बिरुदेव सलगर (वय १२ रा.कोळेगाव) असे मयत झालेल्या मुलाचे नाव आहे. तो सकाळी ६ वाजता झोपेतून उठून घरासमोरील अंगणात थांबला होता. त्यावेळी त्याच्या डाव्या पायाला सर्पदंश त्याला. मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून आकाश काळे (मामा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल

### वडिल मुलाच्या नात्याची गोष्ट बापल्योक'

**सोलापूर** : बाप लेकाचं नातं दिसत नाही कारण ते अबोल असतं. चित्रपटांमधून फारसं न दिसणारं बाप लेकाचं हे नातं आगामी बापल्योक' चित्रपटाच्या माध्यमातून १ सप्टेंबर पासून समोर येणार आहे.नाईटीनाईन प्रोडक्शन्स'चे विजय शिंदे आणि बहुरूपी प्रोडक्शन्स'च्या शशांक शेंडे आणि मकरंद माने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. ट्रेलर आणि चित्रपटातील 'उमगाया बाप रं' हे गीत सध्या ट्रेंडिंगला आहे.नागराज मंजुळे या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते असून,मकरंद माने या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. चित्रपटात वडिलांच्या भूमिकेत ज्येष्ठ अभिनेते शशांक शेंडे असून त्यांच्या मुलाची भूमिका विठ्ठल काळे यांनी साकारली आहे.

### दिल दोस्ती दिवानगी' रुपेरी पडद्यावर

**सोलापूर** : मैत्री आणि प्रेमातील हीच दिल दोस्ती दिवानगी' चित्रपट रूपाने आपल्या समोर ६ ऑक्टोबरला येतोय. ट्रान्स इंडिया मिडिया अँड एन्टरटेनमेन्टची प्रस्तुती असलेल्या दिल दोस्ती दिवानगी' या मराठी चित्रपटाची निर्मिती राजेंद्र राजन यांची असून शिरीष राणे चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.नुकतेच या चित्रपटाचे आकर्षक पोस्टर आपल्या भेटीला आले आहे.

### मृणाल कुलकर्णी, विराजस कुलकर्णी आणि शिवानी रांगोळे एकत्र

**सोलापूर** : काही कुटुंब व्यवसायात,तर काही कलेत एकत्र रमतात.अभिनय,लेखन, दिग्दर्शन अशा तीनही माध्यमातून कलेचा वारसा समर्थपणे जपत रसिकांचे मनोरंजन करणारे, कलेत रमणारे असेच एक कुटुंब आगामी सुभेदार' या चित्रपटात एकत्र दिसणार आहे.अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, त्यांचा अभिनेता पुत्र अभिनेता विराजस कुलकर्णी,आणि त्याची पत्नी अभिनेत्री शिवानी रांगोळे हे तिघंही पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत.

## महापालिकेतर्फे ११ सप्टेंबरला पर्यावरणपूरक गणेशमूर्ती मोफत कार्यशाळा

### सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे : आयुक्त

सुराज्य/सोलापूर

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत सोलापूर महानगरपालिका व श्री गणेशयुग, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची मोफत कार्यशाळा सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ वाजता राजीव गांधी, इनडोअर स्टेडियम, अश्विनी हॉस्पिटल शेजारी, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे,अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी दिली.

या कार्यशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना श्री गणेशयुग, सोलापूरचे संस्थापक विकास गोसावी हे गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण देणार आहेत. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सर्व साहित्य महापालिकेकडून मोफत दिले जाणार आहे. कार्यशाळेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. शहरातील सर्व शाळांमधील इयत्ता ५ वी ते १२वी या वर्गातील प्रत्येकी एकूण १० विद्यार्थ्यांनी (५ विद्यार्थीनी, ५ विद्यार्थी व एक कला शिक्षक) या इको फ्रेंडली गणेश मूर्ती कार्यशाळेसाठी सहभाग नोंदवावा तसेच या कार्यशाळेत हाताने बनवलेल्या श्री गणेशाची मूर्ती आपापल्या घरात प्रतिष्ठापना करावी. ही कार्यशाळा शालेय विद्यार्थ्यांना मोफत आहे. यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे.

कार्यशाळेसाठी लागणारे साहित्य (माती) महापालिकेकडून उपलब्ध करून दिली जाईल. येताना सर्व विद्यार्थ्यांनी हात पुसण्यासाठी नॅपकिन, पाण्याचा मग, वॉटर बॉटल घेऊन यावे. प्रत्येक शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांची यादी खाली दिलेल्या नंबर वर एक्सेल स्वरुपात पाठवावी.अधिक माहितीसाठी विकास गोसावी (९८२२६६०१२१), स्वप्नील सोलनकर (९६५७४२१०८१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त शीतल तेली -उगले यांनी केले आहे.



## वेळापूर पोलीस स्टेशन येथे माजी सैनिकांचा सन्मान

सुराज्य/वेळापूर

वेळापूर पोलीस स्टेशन यांच्या वतीने अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या धर्तीवर मेरी मिट्टी मेरा देश अभियान अंतर्गत सेवानिवृत्त सैनिक ए एस भाकरे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तानाजी देशमुख यांचा वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या हस्ते शाल,बुके श्रीफळ, देऊन सन्मान करण्यात आला .

यावेळी बोलताना वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव म्हणाले की वेळापूर परिसरात विविध हायस्कूल मधून हजारोच्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत हे विद्यार्थी रोड वरून जाताना स्वतःची काळजी घेताना दुर्लक्ष करीत असून विद्यार्थी मित्रांनो या वयातच तुम्हाला वाहतुकीचे नियम समजून घेऊन रोड वरून आपल्या बाजूने जावे, दोन्ही बाजुला पाहुन रस्ता पार करावा, दुचाकी नियमाप्रमाणे कमी वेगाने चालवावे व आपल्या जीवाची काळजी घेऊन घरी सुखरूप पोहोचावे असे सांगून ते पुढे म्हणाले की शाळा परिसरात जर कोणी मुलींची छेडछाड करत असेल तर असे प्रकार सहन केले जाणार नाहीत अशा रोड रोमिओंची माहीती काढून त्यांना पोलीस खाक्या दाखवून त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई केली जाईल असे यावेळी सांगितले.

यावेळी वेळापूर पोलीसस्टेशनचे पोलीस अधिकारी ,अंमलदार व सहकार महर्षी जुनिअर कॉलेज वेळापूर, तसेच न्यू इंग्लिश स्कूल वेळापूर मधील मुले मुली , विद्यार्थी आदिंनी प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील बँड पथक हजर होते. बँड पथकाने देशभक्तीपर गीते वाजवून सदर कार्यक्रम उत्साहात आनंदात साजरा करण्यास सहकार्य केले. या कार्यक्रमा ला सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष डॉ. धनंजय साठे, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, रायचंद खाडे, बाबासाहेब माने, प्रदिप सरवदे, विनायक माने, महेंद्र साठे, अजित साठे, भैय्या मिरगे, गणेश धांडोरे तसेच वेळापूर दत्तनगर खंडाळी येथील पोलीस पाटील उपस्थित होते.




## गोसेवा आयोगाचे प्रथम अध्यक्ष मुंदडा यांचा सोलापुरात नागरी सत्कार

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे प्रथम अध्यक्ष शेखर मुंदडा यांचा सोलापुरात नागरी सत्कार करण्यात आला. नागरी सत्कार समिती, माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, माहेश्वरी समाज, बजरंग दल गोरक्षा विभाग, गोशाळा व सामाजिक संस्था यांच्या वतीने सोनी महाविद्यालय सैफुल येथे गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा शेखर मुंदडा यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर बसवरुढ मठाचे ईश्वरानंद अप्पाजी महास्वामीजी, शिवपुत्र महाराज, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे माहेश्वरी समाजाचे ओमप्रकाश सोमानी गिरीधर भुतडा, एम के फौंडेशनचे महादेव कोगनुरे, वेदांत महास्वामी, महेश भंडारी, योगेश बजाज, रवींद्र मणियार इ. प्रमुख पाहुणे उपस्थित होते. सत्कारमूर्ती शेखर मुंदडा यांनी गोसेवा आयोगाचे ध्येय व उद्दिष्ट सांगितले त्याचबरोबर सर्व गोरक्षकांना एकत्र येऊन आयोगाच्या मार्फत चांगले काम करण्याचे आवाहन केले.

महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे यांनी आपल्या प्रस्तावनेत शेखर मुंदडा, गोसेवा आयोग, सामाजिक संस्था, सामाजिक कार्य आणि सोलापूरकरांचा संबंध कसा आला सांगितले.

यावेळी शिवपुत्र महाराज, ओमप्रकाश सोमानी, महादेव कोगनुरे, वेदांत महास्वामी, महेश भंडारी यांनी आपले मते मांडली. ज्येष्ठ समाजसेवक विलास शहा यांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश कासाट यांनी सर्व आयोगाच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

## पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन लोखंडी कटरने मारहाण

सुराज्य/सोलापूर

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत पतीने लोखंडी कटरने मारहाण करत गंभीर दुखापत केल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास सुशीलम्मा नगर राज मेमोरियल शाळेजवळ घडली.फिर्यादी ज्योती गोविंद पवार (वय-२७, रा.जुना विडी घरकुल) या सुशीलम्मा नगर राज मेमोरियल शाळेजवळील त्यांच्या आईच्या घरी जात असताना ज्योती यांचा पती गोविंद हनमंतु पवार (रा. शाहबादवाडी) हा घरात घुसून फिर्यादीस कामात जात असल्याने तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच भांडण सोडण्यासाठी फिर्यादी यांची आई मध्ये आली असता त्यांना देखील धक्का मारून खाली पाडले व फिर्यादी गळ्यावर लोखंडी कटरने मारून दुखापत केली.तसेच फिर्यादी यांच्या आईला देखील कानाच्या डाव्या बाजूस कटरने मारून दुखापत केल्याची फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी ज्योती पवार यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून गोविंद पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुकडे हे करीत आहेत.



## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त स हि. ने प्रशालेत कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २६ ते २९ ऑगस्ट २०२३ दरम्यान श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेत व्याख्यान, खेळाडूंचा सत्कार, बुद्धीबळ वर्गाचे उद्घाटन व वैयक्तिक व सांघिक खेळांच्या विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे.

शनिवारी खेळाडूंचा सत्कार व मुलांचा पौष्टिक आहार यावर व्याख्यान झाले संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ दामले व सचिवा प्रती चिलजवार यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार झाला.यावेळी स्पोर्ट्स न्यूट्रिशनिस्ट डॉ अवंती दामले यांनी मुलांचा पौस्टीक आहार या विषयावर व्याख्यान दिले यावेळी अध्यक्ष श्री रघुनाथ दमले, सचिव सौ प्रिती चिलाजवार,मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंदगिरी क्रिडाशिक्षक वीरेश अंगडी उपस्थित होते जिल्हा विभाग व राज्य खेळलेल्या खेळाडूंचा सत्कार यावेळी झाला. सुरूवात प्रशालेच्या मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांच्या प्रास्ताविकेने झाली. अतिथी सत्कार संस्थेच्या सचिव सौ.प्रिति चिलजवार यांनी केला .

## केळीच्या गाडीवर ठेवलेली रक्कमसह सोन्याची बोरमाळ लंपास


सुराज्य/सोलापूर

केळीच्या हातगाडीवर ठेवलेली दहा ग्रॅम सोन्याची बोरमाळ व रोख रक्कम असा ३१ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास टिळक चौक ते मधला मारुती दरम्यान घडली. फिर्यादी रंजना दगडू रोकडे (वय-६५,रा.मुकुंद नगर,भवानी पेठ) या टिळक चौक ते मधला मारुती दरम्यान आप्पा हलवाई दुकानासमोरील केळी विक्रीची हातगाडी लावून व्यवसाय करतात. त्यावेळी जास्त ऊन लागत असल्याने फिर्यादी या गाडीला पडदा लावण्यासाठी गाडीवरून खाली उतरले असता,त्यावेळी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या केळीच्या हातगाडीवर ठेवलेली सोन्याची बोरमाळ व रोख रक्कम असा एकूण ३१ हजारांचा ऐवज असलेली पिशवी नकळतपणे चोरून नेली आहे.याप्रकरणी रंजना रोकडे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरु हे करीत आहेत.

## साखरपुड्यातच ऐश्वर्या-मयुरचा विवाह सोहळा भागाईवाडी नागरीकांच्या वैचारिकतेचे कौतुक

सुराज्य/सोलापूर

भागाईवाडी तसं छोटसं गाव ...मात्र नागरीकांच्या लोकसहभागामुळे राज्यात लौकिकात आलेलं.. या गावातील प्रशांत घोडके यांची कन्या ऐश्वर्या, तर बळीरामकाका साठे यांच्या वन् मँन शो नेतृत्वाखाली वाटचाल करणारे वडाळा गावातील शिवाजी जाधव यांचे सुपुत्र मयुर यांचा भागाईवाडीत साखरपुडा होता तर विवाह वरपक्षाकडे होता मात्र साखरपुड्यातच विवाहसोहळा करण्याचा प्रस्ताव मांडला अन् याला दोघाकडुन होकार आला अन ऐश्वर्या-मयुरचा विवाह सोहळा भागाईवाडीच्या ज्ञानमंदीराच्या प्रांगणात संपन्न झाला.



भागाईवाडीची ऐश्वर्या तर वडाळ्याचे मयुर यांच्या साखरपुड्यासाठी भागाईवाडीत वर-वधु पक्षाचे सारे आप्तजण अन् सारं गाव जमल.साखरपुडा दणक्यात झाला. आता जमलयं सारं गाव..तर उरकु शुभमंगल सावधान.. असे अनेक मान्यवरांनी सुचवले वर- वधु पक्षाकडील तयार झाले.अन् भागाईवाडीच्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या प्रांगणात चि.सौ.ऐश्वर्या-चि.मयुर यांचा विवाह सोहळा संपन्न झाला.अलीकडे मुली मिळणे कठीण झाले... काही ठिकाणी तर वराकडील फक्त मुलगी द्या आम्ही सारा खर्च करतो अशी परिस्थिती असताना प्रशांत घोडके यांनी वराकडे लग्न असताना देखील आपले लेकिंचे लग्न स्वखर्चाने करुन ऐश्वर्या तु ऐश्वर्यात रहा असे आशीर्वाद दिले.

या सोहळ्यास भिमराव पडवळ,भागाईवाडीच्या माजी सरपंच कविता घोडके पाटील, नामदेव क्षिरसागर,तुकाराम माने, गावडी दारफळचे उपसरपंच कल्याण काळे,सदस्य विजय घोडके, पोलिस पाटील सजित पाटील,इंद्रजित जाधव,लहु घोडके,अंकुश घोडके,दादा गुरुजी, मुख्याध्यापक आदिल सय्यद,ग्रामसेवक कृष्णात डवले,भारत माने,आदि उपस्थित होते.

# आ.प्रणिती यांनी पराभवाचे खापर फोडले ॲड.आंबेडकरांच्या माथी

## चंद्रयान प्रकरणावरून मोदींवरही केली टीका

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर लोकसभा मतदारसंघ हा तसा पूर्वी काँग्रेसचा हक्काचा गड. पण २०१४ आणि २०१९ या सलग दोन निवडणुकीत दस्तुरखुद्दा काँग्रेसचे वजनदार नेते सुशीलकुमार शिंदे यांना सलग दोन वेळा पराभवाचा झटका बसला. याचे शल्य आजही शिंदे कुटुंबियांना बोचत आहे.**

सोमवारी सोलापुरातील मातंग एकता आंदोलनच्या कार्यक्रमात आमदार प्रणिती शिंदे यांच्या मनातील ही धग बाहेर पडली. गेल्या लोकसभा निवडणुकीतील शिंदेसाहेंबाच्या पराभवाला वंचित बहुजन आघाडीचे ॲड. प्रकाश आंबेडकरच कारणीभूत असल्याचा अप्रत्यक्ष टोला त्यांनी लगावून त्यांचा खरपूस समाचार घेतला. कुणीतरी बाहेरचा येतो निवडणुकीला उभं राहतो, मते घेतो. आणि याच मतविभागणीचा फटका चांगल्या उमेदवाराला बसतो, असे त्या म्हणाल्या. यावरुन ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर असलेला रोष आ. प्रणिती शिंदे यांच्या मनात कायम असल्याचे स्पष्ट झाले. कार्यक्रमानंतर आ. प्रणिती यांच्या भाषणाची चर्चा मात्र उपस्थितांमध्ये जोरदार सुरु होती.

डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात मातंग एकता आंदोलन आणि सोलापूर शहर युवक काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मृती पुरस्कार आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्यावेळीं बोलताना त्यांनी प्रकाश आंबेडकर यांना अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले.

आगामी सोलापूर लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी चर्चेत असलेल्या काँग्रेसच्या प्रदेश कार्याध्यक्षा, आमदार प्रणिती शिंदे यांचा मागील २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत ज्यांच्यामुळे मतविभागणीचा मोठा फटका बसून आपले वडील सुशीलकुमार शिंदे यांना पराभूत व्हावे लागले, ते वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यावरील त्यांचा असलेला राग अजूनही शमला नसल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले. आमदार प्रणिती शिंदे यांनी प्रकाश आंबेडकर यांचा थेट नामोल्लेख टाळत त्यांच्यावर टीका केली.

### वंचितमुळे विजय राहिला 'वंचित'

२०१४ च्या निवडणुकीत पराभवाची झूल झटकून सुशीलकुमार शिंदे हे २०१९ च्या निवडणुकीच्या सामोरे नव्या जोमाने गेले. या निवडणुकीत भाजपाचे डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी विरुध्द काँग्रेसचे सुशीलकुमार शिंदे यांचा थेट सामना होणार होता. पण अकोल्याहून आलेले वंचित बहुजन आघाडीचे ॲड. प्रकाश आंबेडकर हेही रिंगणात उतरल्याने येथे तिरंगी लढत झाली. या निवडणुकीत ॲड. आंबेडकर यांनी जवळपास १ लाख ७० हजार मते मिळवली होती. विशेष म्हणजे शिंदे यांचा दीड लाखांच्या फरकाचे पराभव झाला होता. यावेळी ॲड. आंबेडकर यांना लोकसभा मतदासंघातील दलित मतदारांनी व व स्थानिक नेत्यांनी त्यांना चांगली साथ दिली होती. याचा जबर फटका शिंदे यांना बसला आणि वंचितच्या उमेदवारामुळे शिंदेचा विजय 'वंचित' राहिला.

### मोदींचे चंद्रयानाशी काय देणे घेणे

'पंतप्रधान मोदींचे चंद्रयानाशी काय देणे घेणे आहे. तुम्हाला प्रसिद्धी हवी असेल तर घ्या. मात्र आमच्या बांधवांना न्याय द्या, अशा शब्दात आमदार प्रणिती शिंदे यांनी पंतप्रधानांवर टीका केली आहे.



त्या म्हणाल्या, दीनदलितांच्या विकासासाठी अनेक शासकीय योजना आहेत. परंतु त्यात तेवढ्याच त्रुटीही असतात. लाभार्थीला योजनेचा लाभ कसा मिळवून द्यायचा नाही, हे प्रशासनाला बरोबर माहीत असते. म्हणून दीनदलितांच्या विकास प्रश्नावर आता कोठेतरी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. वंचित दीनदलितांचा आवाज म्हणून काँग्रेस पक्षच खंबीर आहे. इतरजण फक्त निवडणुकीतच येतात आणि निघून जातात. शेवटी रक्ताच्या नात्यापेक्षा विश्वासाचे नाते महत्वाचे असते. हे विश्वासाचे नाते टिकविण्याची जास्त महत्वाचे आहे. त्याची सुरूवात करू या, अशा शब्दात आमदार प्रणिती शिंदे यांना मातंग समाजाला आपणांस साथ देण्याची हाक दिली. यावेळी माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे उपस्थित होते.

# हत्तूर येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

एका २७ वर्षीय तरुणाने राहत्या घराच्या धाब्यावर गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना हत्तुरगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. सागर नागनाथ हिरकुट (वय २७ रा. हत्तुरगाव)असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचा मृतदेह आज सकाळी दहा वाजेच्या सुमारास त्याच्या घराच्या गच्ची धाब्यावरील सिमेंटच्या पिल्लरला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत सागर हिरकुट हा अविवाहित असून तो मजुरीचे काम करीत होता. काल रात्री तो उशिरा घरातील गच्चीवर झोपण्यास गेला होता. सकाळी उशीरापर्यंत तो घरी आला नव्हता. तेंव्हा धाब्यावर जाऊन पाहणी केली असता हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार म्हेत्रे पुढील तपास करीत आहेत. केले . मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला . या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# नवीन शैक्षणिक धोरण क्रांतिकारक : डॉ. कांबळे

सुराज्य/सोलापूर



नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र व क्रांतिकारक बदल होत आहेत. त्या बदलाचा अभ्यास सर्वांनी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक गुण आत्मसात करावे लागतील. त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात त्यांच्या करिअरमध्ये होणार आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ.गौतम कांबळे यांनी केले.

मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या बीबीए व बीसीए अभ्यासक्रमाच्या इंडक्शन प्रोग्राम चे आयोजन दि. २५ रोजी महाविद्यालयात करण्यात आले होते त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे व इंडक्शन कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

इंडक्शन प्रोग्रॅम चे महत्व व त्यासंदर्भात यूजीसी ने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख प्राध्यापक डॉ. कांबळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केला. सोलापुरात अनेक महाविद्यालय उत्तमपणे कार्यरत आ-हेत. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. विद्यार्थ्यांनी मेहनत घ्यावी व योग्य ते मार्गदर्शन घेऊन आपल्या करिअरची निवड करावी असेही ते म्हणाले. कार्यक्रमास प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक प्रार्थना बक्षी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत संस्थेचे प्रभारी संचालक प्रमोद वैद्य यांनी केले. व आभार प्रदर्शन प्रा. स्नेहल पाठक यांनी केले.

# तातडीने २० टक्के टप्पा अनुदान देण्याची मागणी

सुराज्य/सोलापूर

शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या वतीने टप्पा अनुदान तातडीने मिळावे यासाठी सोमवारी जि. प. च्या सीईओ मनीषा आव्हाळे यांच्याकडे .मागणीचे निवेदन देण्यात आले.

२० टक्के टप्पा अनुदान शासनाकडून मिळून ही अनेक शाळा यापासून वंचित आहेत. केवळ शालार्थ आयडी नसल्याचे कारण सांगून अद्याप आठ महिने होत आले तरी अनेक शाळांना २० टक्के टप्पा अनुदान अद्याप दिले नाही .ते तातडीने मिळावे अशी मागणी आव्हाळे यांच्याकडे करण्यात आली. यासाठी सोमवारी अनेक शाळेच्या शिक्षकांनी . शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघ सोलापूर शाखेच्या वतीने सोमवारी हे निवेदन देण्यात आले . यावेळी जिल्हा अध्यक्ष राजकुमार बामणगे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन गावडे, विभागीय अध्यक्ष बामेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

### मारुती फडके पुन्हा रजेवर

शिक्षणाधिकारी मारुती फडके पुन्हा अचानक रजेवर गेल्याने रजचे नेमके गुड काय असावे ? याबाबत जिल्हा परिषदेच्या आवारात एकच चर्चा होत आहे. फडके हे काम करण्यास इच्छुक नसतील तर सीईओ यांनी दुसऱ्या अधिकाऱ्याला पदभार देऊन शिक्षकांच्या प्रलंबित फायलींचा निपटारा करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## अश्विनी ग्रामीण रूग्णालयात अवयवदान जागृती कार्यक्रम

# इस्लाम धर्मात अवयवदान म्हणजे अमन आणि शांती : काझी

सुराज्य/सोलापूर



माणसाच्या अवयवदानाबाबत प्रत्येक धर्मात वेगळे विचार आहेत. इस्लाम धर्म हा मानवेतेसाठी कार्य करणार आहे. या धर्मात अवयवदान म्हणजे अमन आणि शांती आहे, असे प्रतिपादन इस्लाम धर्मगुरू महंमद रफी काझी यांनी केले.

डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सिव्हील रूग्णालय, रासेयो, सोलापूर विद्यापीठ, एम.एम. पटेल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र कुंभारी, अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेतर्फे आयोजित सर्वधर्म समभाव अवयवदान जागृती कार्यक्रमात महंमद रफी काझी बोलत होते.

यावेळी व्यासपिठावर अश्विनी मेडीकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, कॅप्टन शफी शेख, ॲड. प्रशांत कांबळे, अशोक लांबतुरे, आदींची उपस्थिती होती. कुंभारीच्या समर्पण सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या सुरूवातीला धर्मगुरू महंमद रफी काझी यांचा सत्कार डॉ. सुहास कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी डॉ. सुहास कुलकर्णी म्हणाले की, प्रत्येक धर्मात श्रद्धा, अंधश्रद्धा असते. त्याचे निरसन करण्याचा प्रयत्न प्रत्येक समाजातील धर्मगुरूंकडून होतो. त्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कोणत्याही धर्मात अवयव दानाबात अडचण नाही. समाजात याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाची प्रस्तावना अशोक लांबतुरे यांनी केली. सूत्रसंचालन सुदर्शन मोहिते या विद्यार्थ्याने केले.

यावेळी डॉ. अरूधंती कुलकर्णी, डॉ. सिध्देश्वर करजखेडकर, डॉ. गुणवंत मस्के, डॉ. मंगला घटोळे, डॉ. अब्दूल खय्युम शेख, डॉ. पद्मिनी लांबतुरे, डॉ. अंजली गोसावी, लक्ष्मण चिप्पा, मन्मथ भोगडे, उमाकांत ढगे यांच्यासह कॉलेजचे विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

### अवयवदानात आर्थिक व्यवहार नसावा

इतर धर्माप्रमाणे इस्लाम समाजातही अवयवदानाला महत्व आहे. यामुळे दुसऱ्यांना जीवनदान मिळते. अवयवदान, रक्तदान यामध्ये कोणताही आर्थिक व्यवहार नसावा, अशी अपेक्षा धर्मगुरू काझी यांनी व्यक्त केली.

# बबनदादांनंतर आ. संजयमामांनी दिला खा. निंबाळकरांना पाठिंबा

सुराज्य/सोलापूर



आ. बबनदादा शिंदे यांच्या पाठोपाठ त्यांचे बंधू तथा राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत करमाळ्याचे अपक्ष आमदार संजय शिंदे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीसाठी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे. विशेष म्हणजे आमदार शिंदेंनी २०१९ मध्ये निंबाळकर यांच्याविरोधात राष्ट्रवादीच्या तिकिटावर माढ्यातून निवडणूक लढवली होती.

आगामी लोकसभेच्या दृष्टीले माढा मतदारसंघातून खासदार निंबाळकर यांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यासाठी त्यांनी माढ्याच्या शिंदे बंधूंना जवळ केल्याचे दिसून येत आहे. अजित पवार हे भाजप आणि शिवसेनेबरोबर सत्तेत गेले आहेत. त्यांना आ. बबनदादा शिंदे आणि आ. संजयमामा शिंदे यांनी पाठिंबा दिला आहे. आगामी लोकसभा निवडणूक भाजप-सेना-राष्ट्रवादी एकत्र मिळून लढणार आहे. गतवेळी हा मतदारसंघ भाजपाने राष्ट्रवादीकडून खेचून आणला आहे. त्यामुळे यंदाही हा मतदारसंघ भाजपकडेच राहणार आहे. त्यामुळे खा. निंबाळकर यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.

काही दिवसांपूर्वी आमदार संजय शिंदे यांचे बंधू आमदार बबनराव शिंदे यांनीही निंबाळकर यांना दोन लाख मताधिक्क्याने निवडून आणू, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर आता आमदार संजय शिंदे यांनीही निंबाळकरांना पाठिंबा दिला आहे. खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी कामे केली असून विकास केला आहे. गतवेळच्या प्रतिस्पर्ध्याला पाठिंबा देत अधिक मताधिक्याने निवडून आणण्याचे आ. संयजमामा शिंदे यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे राजकिय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या आहेत.






# सीईओ मनिषा आव्हाळे यांचा नेत्रदानाचा संकल्प

## जि.प.तर्फे राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा सप्ताह

सुराज्य/सोलापूर



जिल्हा परिषेदेच्या प्रशासक व सिईओ मनिषा आव्हाळे यांनी मरणोत्तर नेत्रदानाचा स्वतः संकल्प करून सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नेत्रदानाचे आवाहन केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा अंधत्वनियंत्रण समितीने राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन व ज्ञान प्रबोधिनी शालेय विद्यार्थ्यांमार्फत नेत्रदान जनजागृती संदर्भात पथनाट्य सादरीकरण करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे या होत्या. प्रारंभी धन्वंतरी चे पुजन सिईओ आव्हाळे यांचे हस्ते करणेत आले. दीपप्रज्वलन केलेनंतर नेत्रदानाची शपथ देण्यात आली.

या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, नेत्रतज्ञ गणेश इंदुरकर, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता खराडे, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड प्रमुख उपस्थित होते.

सिईओ मनिषा आव्हाळे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेत्रदानाचा संकल्प केला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांच्या हस्ते सिईओ यांना मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आले. त्यानंतर सिईओ मनिषा आव्हाळे यांचे हस्ते उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, अधिक्षक अनिल जगताप, सहाय्यक लेखाधिकारी कटकधोंड, जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांना नेत्रदान संकल्प पत्र वितरीत करणेत आले. त्यानंतर नेत्रदान केले नातेवाईक लक्ष्मीनारायण गुर्रम, प्रकाश विधानी, शरद ढाले यांचे मातोश्री यांचा गौरव करणेत आला.

प्रास्तविक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ. विलास सरवदे यांनी केले. आभार विकास लिंगराज यांनी आभार मानले. यावेळी ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. ज्ञानप्रबोधिनी च्या गायत्री मोरे, भार्गवी सुतार, निहारिका हुच्चे, मृणाल देशमुख, अनघा पुजारी, आर्या गवळी, किरण भुसेकर, शर्वरी काटे, भार्गवी कुलकर्णी, आराध्या शंकू, अभया वानकर, समृध्दी होनमुटे, सर्वेश देशपांडे, शर्विल नागणे, श्रेयस सलगर, आदर्श आकुडे, प्रथमेश पवार, सुदर्शन रामपुरे, सुवर्णनील गलंडे, विनय कुलकर्णी, आयुष कांबळे, कणक शंकु, स्वरा स्वामी, शिक्षिका रत्नमाला जोशी, रजनी भदे, लेखक व निर्देशक राजु मोहोळकर यांनी परिश्रम घेतले.,

### जी शपथ घेतो तिचा अंगीकार करा

जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेत्रदान चळवळीत सहभाग घेऊन नेत्रदान करावे, असे आवाहन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी करत स्वत मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला. स्वर्ग व नरक कोणाला माहित आहे. याच डोळ्यांनी जग पहा. या सभागृहामध्ये आपण जी शपथ घेतो त्या शपथेचा जीवनात अंगीकार करा. असे आवाहन त्यांनी केले.